cmyk

## संपादकीय

### महायुतीचा एकत्रित आवाज लुप्त

महाराष्ट्रात आल्या आल्या पंतप्रधान मोदी यांनी उध्दव ठाकरे यांच्या सेनेला नकली सेना म्हटले. आता ते ठाकरेंवर तुटून पडतील असे वाटत होते. पण, दुसरा टप्पा संपता संपता त्यांना रोख बदलावा लागला. ठाकरे यांना जनतेतून मिळणारा प्रतिसाद त्याला कारणीभूत होता की अन्य काही कारणे आहेत हे अद्याप स्पष्ट झालेले नसले तरी त्यांनी शरद पवारांचा 'भटकती आत्मा' असा उल्लेख केला. त्याचा पवारांनी पुरेपूर उपयोग करून घेतला. वास्तविक राज्याच्या एका ज्येष्ठ नेत्यांबद्दल अशा वक्तव्याचा महाविकास आघाडीने जोरदार विरोध केला पाहिजे होता. मात्र निवडणुकीची टीका म्हणून त्यांनी त्याचे भांडवल केले नाही.


# दैनिक राज्य लोकतंत्र

www.epaper.rajyaloktantra.com नवी दिशा... नवे विचार..... email:rajyaloktantra75@gmail.com

बीड – महाराष्ट्र | वर्ष – ४ | अंक–२६ | मंगळवार दि.७ मे २०२४ | RNI No.: MAHMAR/2021/85884 | NO.L SB/BEED/RNP-206/2024-26 | • पाने– ६ | किंमत ३ रूपये


### नीटच्या डमी उमेदवार विद्यार्थिनीवर गुन्हा

नवी मुंबई : रविवारी झालेल्या नीटच्या परीक्षेत बेलापूर येथील केंद्रावर डमी उमेदवार मिळून आली आहे. परीक्षार्थी विद्यार्थिनीच्या वतीने ती परीक्षा देण्यासाठी राजस्थान येथून आली होती. याप्रकरणी तिच्यावर सीबीडी पोलिस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे.वैद्यकीय अभ्यासक्रमाच्या प्रवेशासाठी घेतली जाणारी नीट परीक्षा रविवारी झाली. बेलापूर येथील डी. वाय. पाटील विद्यापीठाच्या केंद्रावर देखील ही परीक्षा घेण्यात आली. त्यानुसार दुपारी परीक्षा सुरु असताना परीक्षा केंद्रावर नॅशनल टेस्टिंग एजन्सी मार्फत फोन आला होता.

# खरंच..केंद्र सरकार ५ लाख टन कांदा खरेदी करणार का?

## खरेदी केंद्राला परवाने कधी मिळणार?

**पुणे । प्रतिनिधी**

केंद्र सरकारने नुकतीच कांदा निर्यातबंदी उठवण्याची घोषणा केली आहे. त्याचबरोबर १ मॅट्रिक टन कांदा निर्यातीसाठी जवळपास ४० टक्के अर्थात ५५० डॉलर्स निर्यात मूल्य निश्चित करण्यात आले आहे. अशातच आता केंद्र सरकारकडून पाच लाख टन कांदा खरेदी करण्यात येणार आहे. एनसीसीएफ आणि नाफेडमार्फत हा कांदा खरेदी केला जाणार आहे. अशी माहिती एनसीसीएफचे अध्यक्ष विशाल सिंग यांनी पिंपळगाव बसवंत येथे माध्यमांना दिली आहे. यात प्रामुख्याने नाफेडकडून २.५ लाख टन आणि एनसीसीएफसाठी २.५ लाख टन कांदा खरेदी केला जाणार आहे. असेही त्यांनी म्हटले आहे. तर खरेदी केंद्राला अजूनही परवाने मिळाले नसल्याने खरच केंद्र सरकार ५ लाख टन कांदा खरेदी करणार आहे का? असा




प्रश्न उपस्थित केला जात आहे.

रब्बी खरेदी पीएसएफ–२०२४ साठी एफपीओएस आणि शेतकऱ्यांमध्ये जागरूकता निर्माण करण्यासाठी साठवण उपलब्धता आणि एनसीसीएफच्या टीमची खरेदीची तयारी तपासण्यासाठी विशाल सिंग पिंपळगाव बसवंत येथे आले होते. त्यावेळी त्यांनी ही माहिती दिली आहे. येत्या जूनपर्यंत नाशिक, पुणे, हरयाणा आणि गुजरात येथून हा पाच लाख मेट्रिक टन कांदा खरेदीचे उद्दिष्ट पूर्ण करण्यात येणार आहे. असेही त्यांनी यावेळी म्हटले आहे. कांदा खरेदी धोरणाचा एक भाग म्हणून शेतकऱ्यांना त्यांचा कांदा जमा करता यावा. यासाठी सुरुवातीला सुमारे ५० केंद्र उघडणार आहे. शेतकऱ्यांसाठी पेमेंट यंत्रणा थेट लाभ हस्तांतरणाद्वारे (डीबीटी) करण्यात येणार आहे. ७ मेपासून खरेदी प्रक्रिया सुरू करणार असल्याचे त्यांनी सांगितले आहे. दरम्यान, निवडणूकीमुळे निर्यातबंदी उठवली असून, एनसीसीएफ व नाफेडमार्फत कांदा खरेदीतून शेतकऱ्यांना कोणताही फायदा होणार नसल्याची टीका शेतकऱ्यांनी केली आहे.

## प्रकाश आंबेडकर उद्या बीडमध्ये

**बीड । प्रतिनिधी**



**वंचित बहुजन आघाडीचे बीड लोकसभा उमेदवार अशोक हिंगे पाटील यांच्या लोकसभा निवडणुकीच्या प्रचारार्थ दि. ०८ मे २०२४ बीड शहरात सायंकाळी पाच वाजता प्रचार सभा होत आहे. या बैठकीमध्ये गाव, तांडा, वाडी वस्ती मधील जास्तीत जास्त मतदार सभेला कशा पद्धतीने उपस्थित राहतील यासाठी नियोजन सुरू आहे. रेकॉर्ड ब्रेक करणारी ही सभा घेण्यात येईल असा निर्धार वंचित बहुजन आघाडीच्या पदाधिकारी, कार्यकर्त्यांनी केला आहे.**

वंचित बहुजन आघाडीचे बीड लोकसभेचे उमेदवार अशोक हिंगे पाटील यांच्या प्रचारार्थ गावागावांमध्ये मोठी यंत्रणा उभारण्यात आली असून प्रचार रथ, बॅनर यासह पथनाट्य कलापथक अशोक हिंगे पाटील यांच्या विजयासाठी कार्यान्वित करण्यात आले आहे. मतदार तिथे वंचित बहुजन आघाडीचा पदाधिकारी उभारण्यात आला असून गेल्या आठ दिवसांपासून अशोक हिंगे पाटील यांच्या प्रचारार्थ वंचित बहुजन आघाडीचे पदाधिकारी आणि कार्यकर्ते संपूर्ण बीड जिल्हा पिंजून काढत आहेत. गेल्या शुक्रवार दि. ३ मे रोजी अंबाजोगाई शहरात ॲड. प्रकाश आंबेडकर यांची रेकॉर्ड ब्रेक सभा संपन्न झाली असून अशोक हिंगे यांच्या विजयावर शिक्कामोर्तब झालेला आहे. आता येत्या बुधवार दि. ८ मे २०२४ रोजी ◀◀ पान २ वर

# वातावरण फिरणार; पंकजाताईंच्या मंत्रीपदाबाबत मोदी बोलणार?

## आंबाजोगाईत आज पंतप्रधानांची जाहीर सभा; विजयाचा मार्ग होणार सुकर

**बीड । प्रतिनिधी**

**मराठा आरक्षणाची धग लोकसभा निवडणुकीपर्यंत पोहचल्याने भाजप उमेदवार पंकजाताई मुंडे यांच्या समोर सुरुवातीला अनेक अडथळे आले. मराठा समाजाचा रोष पत्कारावा लागला, अनेकांचे रुसवे फुगवे दुर करावे लागले. मात्र पंतप्रधान नरेंद्र मोदी हे आंबाजोगाई येथील सभेत पंकजाताई मुंडे यांच्या मंत्रीपदाबाबत संकेत देणार असल्याचे म्हटले जात असून पंकजाताई मुंडे यांच्या विजयाचा मार्ग सुकर होणार आहे.**

दि. ७ मे रोजी नरेंद्र मोदी यांच्या आंबाजोगाई येथे होणाऱ्या सभेला महायुतीच्या स्थानिक नेत्यांसह मुख्यमंत्री एकनाथ शिंदे, उपमुख्यमंत्री देवेंद्र





फडणवीस, अजित पवार यांची उपस्थिती राहणार आहे. या सभेत मोदी काय बोलतात याकडे राज्याचे लक्ष लागले आहे.

बीड लोकसभा निवडणुक यावेळी महायुती व महाविकास आघाडीसाठी प्रतिष्ठेची बनली आहे. भाजप नेत्या पंकजाताई मुंडे या निवडणुक लढत असल्याने या निवडणुकीकडे राज्याचे लक्ष लागले आहे. महायुतीकडून पंकजाताई मुंडे, महाविकास आघाडीकडून बजरंग सोनवणे तर वंचित बहुजन आघाडीकडून अशोक हिंगे निवडणुकीच्या आखाड्यात उतरले आहे. अशोक हिंगे यांच्या उमेदवारीने ही लढत तिरंगी झाली असून बजरंग सोनवणे यांच्या पाठीशी मराठा आणि मुस्लिम समाज असल्याचे दिसत असून अशोक हिंगे यांनीही आपल्या बाजूने मराठा ◀◀ पान २ वर

### महिलांचा पाठिंबा वाढणार

मोदी यांनी महिलांसाठी उज्वला गॅस योजना आणल्यामुळे महिलांना मोठा दिलासा मिळाला होता. तसेच इतर महत्वाच्या योजना महिलांसाठी केंद्राच्या सुरु आहेत. मोदी स्वत: येवून महिलांशी संवाद साधणार असल्याने पंकजाताई मुंडे यांना जिल्ह्यातील महिलांचा पाठींबा वाढणार आहे.

### जातीपातीच्या भिंती गळून पडणार

मोदी यांच्या सभेनंतर जिल्हयातील जातीपातीच्या भिंती गळून पडणार असून विकासाच्या बाजूने मतदार उभे राहणार आहेत. कारण मोदींच्या गॅरंटीवर संपुर्ण देशाने विश्वास ठेवला असून जिल्ह्यातील जनताही तसाच विश्वास ठेवणार असल्याचे दिसते.

### ज्येष्ठ नागरिकांसह दिव्यांग मतदारांनी केले मतदान

बीड । प्रतिनिधी

लोकसभा निवडणुकीची रणधुमाळी सुरू असून बीड लोकसभा मतदारसंघात दिनांक सहा मे पासून ८५ पेक्षा जास्त वय असलेले जेष्ठ मतदार आणि दिव्यांग मतदार यांच्यासाठी प्रशासनाकडून मतदान प्रक्रिया करण्यात आली आहे. सोमवारी एकूण ४८ मतदारांनी मतदान केले. मतदार संघामधील दिव्यांग आणि ८५ पेक्षा जास्त वय असलेल्या मतदारांच्या थेट घरी जाऊन बॅलेट पेपरवर गुप्तपणे मतदान करण्यात येत आहे. दुर्गम भागात जाऊन सुद्धा निवडणूक कर्मचाऱ्यांनी मतदान घेण्यास सुरुवात केली.

## आज तिसऱ्या टप्प्याचे मतदान

### देशात ९४ तर महाराष्ट्रात ११ जागांसाठी मतदान

**बीड । प्रतिनिधी**

**लोकसभा निवडणुकीतील तिसऱ्या टप्प्यासाठीच्या प्रचाराच्या तोफा थंडावल्या आहेत. १२ राज्यांतील ९४ जागांसाठी मंगळवारी ७ मे रोजी देशभरात मतदान होणार आहे. महाराष्ट्राचा विचार करायचा झाल्यास राज्यात ११ लोकसभा मतदारसंघांमध्ये मंगळवारी मतदान होणार आहे.**

राज्यातील रायगड, रत्नागिरी–सिंधुदुर्गासह पश्चिम महाराष्ट्राचा समावेश आहे. तिसऱ्या टप्प्यातील प्रचारतोफा थंडावण्यापूर्वी शेवटच्या क्षणापर्यंत मातब्बर नेत्यांनी प्रचाराच्या रणधुमाळीत सहभाग घेतल्याचे पाहायला मिळाले. एकिकडे राज्यात प्रचारतोफाची धग कमी झाली असली तरीही दुसरीकडे मात्र राजकीय वर्तुळात चाललेली उलथापालथ आणि आरोप प्रत्यारोपांचे सत्र मात्र क्षणाक्षणाला वेगळी रुपे दाखवताना दिसत आहे.

## जातनिहाय जनगणना करून आरक्षणाची मर्यादा वाढवू-जयंत पाटील

### दहा वर्षात मोदींनी देशवासीयांचा अपेक्षाभंग केला–खा.डॉ.अमोल कोल्हे

**आष्टी । प्रतिनिधी**

जातनिहाय जनगणना करून आरक्षणाची मर्यादा वाढवण्यासाठी आम्ही प्रयत्न करून असे सांगून जयंत पाटील म्हणाले, भाजपच्या उमेदवाराचा पराभव दिसू लागल्याने बीड जिल्ह्यात पंतप्रधान यांची सभा आयोजित केली जातेय यांच्यातच महविकास



आघाडीचे बजरंग सोनवणे यांचा विजय स्पष्ट झाला आहे. तर राज्यात महाविकास आघाडीच्या ३० ते ३५ खासदारकीच्या जागा निवडून येणार असून भाजप महायुतीचा पराभव निश्चित असल्याचा विश्वास राष्ट्रवादी काँग्रेस शरदचंद्र पवार पक्षाचे प्रदेशाध्यक्ष जयंत पाटील यांनी व्यक्त केला.राष्ट्रवादी काँग्रेस शरदचंद्र पवार पक्ष आणि महाविकास आघाडीचे उमेदवार बजरंग बप्पा सोनवणे यांच्या प्रचारार्थ ◀◀ पान २ वर

## आरक्षणाबाबत राहुल गांधींच्या आरोपांची निवडणूक आयोगाकडे तक्रार करणार – रामदास आठवले



**मुंबई । प्रतिनिधी**

पंतप्रधान नरेंद्र मोदींनी आरक्षणाचे कायम संरक्षण केले असून, गरिबांसाठी १० टक्के आरक्षण नव्याने लागू केलेले आहे. एससी,एसटी, ओबीसी यांसह कोणत्याही समाज घटकाचे संविधानाने दिलेले आरक्षण कधीही बदलणार नाही असे नरेंद्र मोदी, अमित शहा यांनी वांरवार सांगीतले आहे. तरीही काँग्रेस नेते राहुल गांधी यांनी तेलंगणा मध्ये मोदी आरक्षण हिरावून घेतील असा खोटा आरोप केला आहे. त्यांच्या आरोपची तक्रार निवडणूक आयोगाकडे करणार असल्याचे रिपाइंचे राष्ट्रीय अध्यक्ष रामदास आठवले यांनी सगीतले. हैदराबाद येथे आयोजित रिपाइंच्या बैठकीत ते बोलत होते.

गेल्या १० वर्षात चांगले काम करुन मोदींनी जनतेचा विश्वास जिंकला आहे. त्यामुळे काँग्रेस आणि विरोधकांकडे कोणतेही मुद्दे उरले नाहीत. त्यामुळे राहुल गांधी ◀◀ पान २ वर

## मोदींची हुकूमशाही गाडण्यासाठी बजरंग सोनवणे यांना विजयी करा-परमेश्वर सातपुते

**आष्टी । प्रतिनिधी**

पंतप्रधान नरेंद्र मोदी आणि अमित शहा यांनी देशांमध्ये हुकूमशाही चालवली आहे. चुकीच्या पद्धतीने अनेकांना जेलमध्ये टाकण्यात येत आहे. देशांमध्ये लोकशाही बळकट करण्यासाठी आणि मोदींची हुकूमशाही काढण्यासाठी महाविकास आघाडीचे उमेदवार बजरंग सोनवणे यांना विजयी करा, असे आवाहन उद्धव ठाकरे शिवसेनेचे जिल्हाप्रमुख परमेश्वर सातपुते यांनी जाहीर सभेत केले.

आष्टी येथे महाविकास आघाडीचे उमेदवार बजरंग बप्पा सोनवणे यांच्या प्रचारार्थ राष्ट्रवादी ◀◀ पान २ वर



### बाजारभाव

कृषि उत्पन्न बाजार समिती, बीड,दि.६ मे २०२४

आवक क्विंटलमध्ये तर भाव प्रतिक्विंटलचे आहेत

| शेतमाल (आवक) | किमान | कमाल | सरासरी |
|---|---|---|---|
| गहू : ७.०० क्विंटल | २,२७६ | २,३०१ | २,२८८ |
| ज्वारी/हायब्रिड : ७१.५० क्विंटल | १,८९० | ३,२०१ | २,४८३ |
| मूग : ०.५० क्विंटल | ९,८५० | ९,८५० | ९,८५० |
| तूर : ५.५० क्विंटल | ९,५०० | १०,६६० | १०,१२० |
| उडीद : १.५० क्विंटल | ५,००० | ६,५०१ | ५,७५० |
| बाजरी: १०७.५० क्विंटल | २,००१ | २,६४१ | २,४०० |
| चिंच/लोकल: १०.०० क्विंटल | ६,५०० | ६,५०० | ६,५०० |
| सोयाबीन: ७०.०० क्विंटल | ४,६१० | ४,६१० | ४,६१० |
| हरभरा: २.०० क्विंटल | ४,५०० | ४,५०० | ४,५०० |


# आरटीई अंतर्गत प्रवेशाचा मार्ग पुन्हा झाला मोकळा

## » शासनाने प्रवेश प्रक्रियेत केलेल्या बदलाला न्यायालयाची स्थगिती

**पुणे । प्रतिनिधी**

**शिक्षण हक्क कायद्यातील (आरटीई) २५ टक्के राखीव जागांच्या प्रवेश प्रक्रियेत केलेल्या बदलांबाबत राज्य सरकारने फेब्रुवारीमध्ये काढलेल्या अधिसूचनेला मुंबई उच्च न्यायालयाने सोमवारी स्थगिती दिली. त्यामुळे आता सध्या सुरू असलेल्या या जागांवरील प्रवेशाच्या प्रक्रियेत आर्थिकदृष्ट्या दुर्बल आणि वंचित घटकातील बालकांचा खासगी इंग्रजी शाळांमधील प्रवेशाचा मार्ग पुन्हा एकदा खुला झाला आहे.**

राज्य सरकारने शिक्षण हक्क कायद्यातील (आरटीई) २५ टक्के राखीव जागांच्या प्रवेश प्रक्रियेत ९ फेब्रुवारी २०२४ रोजी केलेल्या




बदलांना आव्हान देणारी जनहित याचिका अखिल भारतीय समाजवादी अध्यापक सभेने दाखल केली होती. यासंदर्भात अध्यापक सभेसह आणखी तीन जणांनी याचिका दाखल केली होती, या याचिकांवर सोमवारी उच्च न्यायालयात एकत्रित सुनावणी घेण्यात आली. या सुनावणीदरम्यान राज्य सरकारने ९ फेब्रुवारी २०२४ रोजी प्रसिद्ध केलेल्या अधिसूचनेला न्यायालयाने स्थगिती दिली आहे, अशी माहिती ॲड. देवयानी कुलकर्णी यांनी दिली.

शिक्षण हक्क कायद्यांतर्गत गेल्या काही वर्षांपासून आर्थिकदृष्ट्या दुर्बल आणि वंचित घटकातील बालकांना खासगी शाळांमध्ये प्रवेशासाठी २५ टक्के जागा राखीव ठेवल्या जातात. त्या जागांवरील प्रवेशासाठी प्राथमिक शिक्षण विभागातर्फे केंद्रीय प्रवेश प्रक्रिया राबविण्यात येते. दरम्यान, संबंधित बालकांच्या निवासस्थानापासून एक किलोमीटरच्या अंतरावर अनुदानित, शासकीय किंवा स्थानिक स्वराज्य संस्थांच्या शाळा नसतील आणि स्वयंअर्थसहाय्यित शाळा असेल तरच अशा परिस्थितीत त्या स्वंयअर्थसहाय्यित शाळेत मुलांना २५ टक्के राखीव जागांवर प्रवेश मिळेल, असा बदल करणारी अधिसूचना राज्य सरकारने ९ फेब्रुवारी २०२४ रोजी प्रसिद्ध केली. राज्यातील विविध पालक संघटनांनी राज्य सरकारच्या या बदलांचा विरोध केला. त्यात काही संघटनांनी न्यायालयात धाव घेतली. आता न्यायालयाने सरकारच्या अधिसूचनेला स्थगिती दिली आहे. न्यायालयात याचिकाकर्त्यांमधील अखिल भारतीय समाजवादी अध्यापक सभेच्या वतीने ॲड. मिहीर देसाई आणि ॲड. देवयानी कुलकर्णी यांनी बाजू मांडली.

**» आरटीईनुसार २५ टक्के राखीव जागांवरील प्रवेशाबाबत राज्य सरकारने फेब्रुवारीमध्ये प्रसिद्ध केलेल्या अधिसूचनेला मुंबई उच्च न्यायालयाने स्थगिती दिली आहे. मात्र, अद्याप न्यायालयाचा प्रत्यक्ष निकाल हाती आलेला नाही. परंतु, न्यायालयाच्या आदेशानुसार आणि राज्य सरकारच्या सूचनेनुसार पुढील कार्यवाही करण्यात येईल, असे शिक्षण विभागाकडून सांगण्यात आले आहे.**

cmyk

## अग्रलेख

# महायुतीचा एकत्रित आवाज लुप्त

महाराष्ट्रात आल्या आल्या पंतप्रधान मोदी यांनी उध्दव ठाकरे यांच्या सेनेला नकली सेना म्हटले. आता ते ठाकरेंवर तुटून पडतील असे वाटत होते. पण, दुसरा टप्पा संपता संपता त्यांना रोख बदलावा लागला. ठाकरे यांना जनतेतून मिळणारा प्रतिसाद त्याला कारणीभूत होता की अन्य काही कारणे आहेत हे अद्याप स्पष्ट झालेले नसले तरी त्यांनी शरद पवारांचा 'भटकती आत्मा' असा उल्लेख केला. त्याचा पवारांनी पुरेपूर उपयोग करून घेतला. वास्तविक राज्याच्या एका ज्येष्ठ नेत्यांबद्दल अशा वक्तव्याचा महाविकास आघाडीने जोरदार विरोध केला पाहिजे होता. मात्र निवडणुकीची टीका म्हणून त्यांनी त्याचे भांडवल केले नाही. असा मुद्दा भाजपच्या हाती लागला असता तर त्यांनी त्यांच्या विरोधकांना सळो की पळो करून सोडले असते. भाजपच्या पारंपरिक मतदाराला मोदींनी पवारांवर टीका करून त्यातल्या त्यात सुखावले, असे म्हणायला वाव आहे.

दुसऱ्या अनेक गोष्टींच्या प्रमाणेच महाराष्ट्रात भाजपचे किंवा सत्ता आघाडीचे मुख्य प्रचारक मोदी आणि शहा हेच आहेत. इतरांचा तेवढा प्रभाव दिसेना. त्याच त्या प्रकारची महायुतीच्या नेत्यांची भाषणे आणि मोदींच्या नावानेच मत मागितले जात असल्याने या नेत्यांचा स्वत:चा प्रभाव पोडायचा हा काळ तसा वायाच गेला आहे. भाजपचे सगळे भले भले वक्ते गायब आहेत. गुलाबराव पाटील यांच्यासारखी तोफ शांत झाली आहे. भुजबळांनी उध्दव ठाकरे आणि शरद पवार यांच्याबद्दल सहानुभूती आहे असे म्हणत आपल्याच तोफेत पाणी ओतले आहे. राणे गावात गुंतून पडलेत. गडकरींच्या आजारपणाची चर्चा खूपच चालवली जात आहे. तर दुसरीकडे जयंत पाटील, संजय राऊत, नाना पटोले, सुषमा अंधारे यांच्या सभा गाजत आहेत. आदित्य ठाकरे, रोहित पवार, वर्षा गायकवाड, सतेज पाटील, प्रणिती शिंदे, अमित देशमुख, विश्वजीत कदम अशा विरोधकांत असलेल्या युवा नेत्यांच्या सभा गाजत आहेत. रोहित पाटील यांच्या भाषणात आर आर पाटील यांची झाक दिसत असल्याने लोक भावुक होत आहेत. लोकांच्या मनावर प्रभाव टाकणारे हे मुद्दे आणि सत्ताधारी आघाडीत तळमळीने, उद्वेगाने, संतापाने बोलणारे अजित पवार यांच्या सभा तेवढ्या सर्वत्र चर्चेचा विषय आहेत.

यापूर्वी देवेंद्र फडणवीस यांचे भाषण आणि त्यांनी कुठल्या भागात कुणाला काय शब्द दिला याला फार महत्त्व निर्माण व्हायचे. यावेळी त्यांच्या त्या प्रतिमेला बराच धक्का बसला आहे. पण, फडणवीस तरीही गावोगावी जोडलेल्या माणसांना वेळ देऊन धावत्या दौऱ्यात देखील अनेकांच्या घरी भेट देऊन आपली आपली नाती जपताना दिसत आहेत. त्यांच्या शब्दाखातर सत्तेपासून दूर फेकली गेलेली भाजपमधील तसेच मित्रपक्षातील कर्ती मंडळी प्रचारात सक्रिय होऊन स्थानिक मैदान गाजवत आहेत. पण या सगळ्यात महायुतीचा एकत्रित आवाज लुप्त झाला आहे. सगळेच बंडोबा सत्तेत थंडोबा झाले की केले? याची शंका आहे. आपल्याच पोळीवर तूप ओढण्याची स्पर्धा मंत्रालयापासून मैदानापर्यंत कुठेही कमी झालेली नाही. याउलट महाआघाडीत सांगलीसारखा एखाद दुसरा अपवाद सोडला तर लोक जीव ओतून काम करत आहेत. ही स्थिती आणि 'ठाकरे काही माझे शत्रू नाहीत' असे मुंबईतील लढाई सुरू होण्यापूर्वी मोदी यांनी म्हणण्याला अर्थ आहे. आता लवकरच राणे, शिंदे, राज ठाकरे अशी मंडळी उध्दव ठाकरेंवर तुटून पडतील, शेलार, वाघ, लाड, दरेकर उपमर्द करतील. चौथा आणि पाचवा टप्पा महाराष्ट्राच्या भविष्याच्या राजकारणाचा वेगळा अध्याय लिहिणारा आहे. विधानसभा निवडणुकीपर्यंत राजकारण अजून बदललेले असेल. नेतृत्वात बदल होतील की वेगळेच काही घडेल ते इथल्या जनतेच्या मतदानातून दिसणार आहे.

# पंकजा मुंडे, बजरंग सोनवणे यांच्यासह ७ उमेदवारांना निवडणूक विभागाची नोटीस

**बीड । प्रतिनिधी**

बीड लोकसभा मतदारसंघात निवडणुकीत महायुतीच्या उमेदवार पंकजा मुंडे आणि महाविकास आघाडीचे उमेदवार बजरंग सोनवणे यांना खर्चातील तफावतबाबत तर ७ उमेदवारांना निवडणूक खर्चाची नोंदवही तपासणीसाठी सादर करण्यात कसूर केल्याबाबत जिल्हा निवडणूक निर्णय अधिकारी दीपा मुधोळ मुंडे यांनी नोटीस बजावली आहे. नोंदवही लेखांची प्रथम तपासणी न करणाऱ्या उमेदवारांमध्ये करुणा धनंजय मुंडे, शेषेराव चोकोबा वीर, गोकुळ बापूराव सवासे, प्रकाश भगवान सोळंके, राजेंद्र अच्युतराव होके, शेख तौसिफ अब्दुल सत्तार, शेख एजाज शेख उमर यांची नावे आहेत.

निवडणूक आयोगाच्या निर्देशाप्रमाणे प्रथम खर्चाची नोंदवही शनिवार दिनांक ०४ मे रोजी सकाळी १० ते सायंकाळी ०५ या कालावधीत खर्च सनियंत्रण कक्ष ३९ बीड लोकसभा मतदारसंघ राष्ट्रीय विज्ञान केंद्र () कक्ष जिल्हाधिकारी कार्यालय येथे उपस्थित राहून अथवा प्रतिनिधी उपस्थित राहून नोंदवही तपासणी करून घेणे बंधनकारक होते. जे उमेदवार अभिलेखाचे तपासणी करण्यास आलेले नाहीत अशा उमेदवारांना लोकप्रतिनिधी अधिनियम १९५१ चे कलम ७७ अन्वये निवडणूक खर्चाचा हिशोब ठेवण्यात कसुर केल्याचे निदर्शनास आले आहे. अशा ०७ उमेदवारास नोटीस पाठविण्यात आले असून या उमेदवारांनी स्वतः अथवा प्राधिकृत प्रतिनिधी मार्फत ४८ तासात निवडणूक खर्चाचा हिशोब सादर करणे आवश्यक आहे. अन्यथा भारतीय दंड संहितेचे कलम १७१ 'झ' अन्वये कायदेशीर कारवाई करण्यात येईल, अशा आशयाचे नोटीस जिल्हा निवडणूक अधिकारी यांनी बजावले आहे. २ उमेदवारांकडून तपासणीची तफावतबाबत नोटीस भारतीय जनता पक्षाच्या उमेदवार पंकजा मुंडे, यांना आणि नॅशनॅलिस्ट काँग्रेस पार्टी शरदचंद्र पवार गटाचे उमेदवार बजरंग सोनवणे या दोन उमेदवारांना तपासणीसाठी सादर केलेल्या निवडणूक खर्चातील तफावती बाबत नोटीस जारी करण्यात आलेले आहे. पंकजा मुंडे यांनी दिनांक २४ एप्रिल ते २ मे २०२४ पर्यंत सादर केलेल्या एकूण खर्चाची रक्कम दोन लाख ७३ हजार ३८,(२७३०३८) एवढी सादर केली आहे. खर्च निरीक्षक कार्यालयाच्या छायांकित निरीक्षण नोंदवहीनुसार नोंदविण्यात आलेल्या एकूण खर्च रक्कम ८ लाख ६८ हजार १०१ (८६८१०१) एवढी आहे. यामध्ये छायांकित नोंदवहीनुसार झालेल्या खर्चाचा विचार करता उमेदवाराकडून ०५ लाख ९५ हजार ६३ त्यांच्या लेख्यात कमी दर्शविलेली आहे. बजरंग सोनवणे यांनी २२ एप्रिल ते ०२ मे २०२४ पर्यंत सादर केलेल्या एकूण खर्चाची रक्कम ०३ लाख ५३ हजार १६५ आहे. तर कार्यालयाच्या छायांकित निरीक्षण नोंदवहीनुसार नोंदविण्यात आलेल्या एकूण खर्चाची रक्कम ०८ लाख ८४ हजार ४५९ आहे. छायांकित नोंदवहीनुसार झालेल्या खर्चाच्या विचार करता उमेदवाराकडून ०५ लाख ३१ हजार २९४ रक्कम त्यांच्या लेखात कमी दर्शविली आहे. लोकप्रतिनिधी अधिनियम १९५१ च्या कलम ७७ प्रमाणे निवडणूक कालावधीत प्रत्येक उमेदवार स्वतः किंवा त्यांच्या प्रतिनिधी द्वारे निश्चित तारखेस नामनिर्देशित झालेल्या व त्याचा निकाल जाहीर झाल्याची तारीख दोन्ही तारखांसह या दरम्यान त्यांनी किंवा त्यांच्या प्रतिनिधींनी निवडणुकीच्या संबंधातील सर्व खर्चाचे स्वतंत्र व अचूक लेखी ठेवतील अशी तरतूद आहे. या दोन उमेदवारांचे सदर तरतुदीचे पालन न केल्यामुळे त्यांना नोटीस दिले असुन ४८ तासांच्या आत खुलासा सादर करण्यात लावलेला आहे अन्यथा लोकप्रतिनिधी अधिनियम १९५१ चे कलम ७७ अनुसार कायदेशीर कारवाई करण्यात येईल, असे जिल्हा निवडणूक अधिकारी दीपा मुधोळ मुंडे यांनी कळविले आहे.

# संरक्षण मंत्र्याचे खोटे विधान, प्रकाश आंबेडकर यांचा आरोप

**पुणे । प्रतिनिधी**

**चीनमधील शक्सगाम खोऱ्यात घुसखोरी सुरू आहे. असे असताना आज संरक्षण मंत्री राजनाथ सिंह यांचे वक्तव्य आले आहे की, तेथील लोक भारतात यायला तयार आहेत. हे प्रचंड मोठे फसवे वक्तव्य आहे. सियाचीनला लागून असलेल्या शक्सगाम खोऱ्यात मोठ्या प्रमाणात भारतविरोधी कारवाया सुरू झाल्या आहेत आणि त्या लोकांसमोर येऊ नये म्हणून संरक्षण मंत्र्यांनी खोटे विधान केले असल्याचा आरोप वंचित बहुजन आघाडीचे प्रमुख ॲड. प्रकाश आंबेडकर यांनी पुणे येथील पत्रकार परिषदेत केली.**

पुढे बोलताना प्रकाश आंबेडकर म्हणाले की, २०१४ च्या लोकसभा निवडणुकीत नरेंद्र मोदी यांनी मी सगळ्यात मजबूत नेता आहे आणि देशाचे नेतृत्व मी कुशलतेने करू शकतो असे वक्तव्य केले. पण त्यांच्या १० वर्षांच्या काळातील परदेशी धोरणाचा आढावा घेतला तर आपल्या लक्षात येईल की, त्यांनी सामान्य माणसांसाठी धोरण आखले नाही. भारताचा जो दबदबा होता, एकंदरीत परदेशी संदर्भातला तो कमी झाला आहे. नेपाळसारखे राज्य हे सुद्धा भारताला आव्हान द्यायला लागले आहे. नेपाळची नवीन शंभर रुपयाची नोट आलेली आहे, त्यामध्ये उत्तराखंडमधील पितोडगा जिल्ह्यातील तीन प्रदेश त्यांचे म्हणून दाखवले असल्याची टीकाही यावेळी त्यांनी केली. ॲड. प्रकाश आंबेडकर पुढे बोलताना म्हणाले की, मध्यंतरी मालदीवसारख्या देशाबरोबर वैयक्तिक संघर्ष झाल्याने त्यांनी तिथली पर्यटन व्यवस्था पूर्णपणे बंद केली. मदत बंद केली आहे. त्यांच्याविरोधातील भूमिका भारताने घेतल्यानंतर आमच्या माहितीप्रमाणे २५० सैन्य अधिकारी माघारी पाठवले आहेत. उरलेल्यांना घेऊन जायला सांगितले आहे. यासंदर्भात आम्ही सरकारकडून स्टेटमेंटची अपेक्षा करत आहोत. अफगाणिस्तानमध्ये तालिबान प्रशासन आहे. बांग्लादेशासोबत आपले संबंध पुन्हा बिघडायला लागले आहेत. पाकिस्तान चीनच्या ताब्यात गेले आहे, श्रीलंका चीनच्या ताब्यात जाण्याच्या वाटेवर असल्याचे सांगत भूतान असा एकच प्रदेश आपल्यासोबत राहिल्याचे दिसते. ऑस्ट्रेलिया, युनायटेड नेशन, इंग्लंड, जर्मन किंवा फ्रान्स हे आपल्यासोबत जिव्हाळ्याने वागत होते, त्यांनी आता अंतर ठेवायला सुरुवात केली आहे. त्यांना असे वाटत आहे की, आपली भूमी आपले स्वायत्त हे इथले इंटेलिजेंट डिपार्टमेंट वापरत आहे का? तेथील नागरिकांना गोळ्या घालण्यात आलेल्या आहेत. भारताच्या विरोधात भूमिका घेत होते याबाबत दुमत नाही, पण त्यांना गोळ्या घालण्यात आल्या. यामध्ये या सरकारचा हात आहे का? अशी शंका यायला लागली आहे म्हणून ही राष्ट्रे अंतर ठेवत असल्याचा आरोपही यावेळी केला. प्रकाश आंबेडकर म्हणाले की, कुवैत आणि दुबईमध्ये भारतीयांची संख्या मोठ्या प्रमाणात आहे. तिथे आता भूमिका घ्यायला लागले आहेत की, एका राष्ट्राचे किती लोक आपल्या देशात असावेत याचा कायदा करावा. भाजपा सरकार २०२४ मध्ये पुन्हा आले, तर आम्हाला भीती आहे की, स्थलांतर कमी करण्याच्या नावाखाली स्वतःच्या देशामध्ये असा कायदा करतील. याचे गुणोत्तर जर त्यांनी जाहीर केले, तर याचा फटका भारतीयांना बसणार आहे. मध्यमवर्गीयांनी विचार करावा आणि या निवडणुकीत त्यांना उत्तर द्यावे. आम्ही असे बघत आहोत की, भारताचे आंतरराष्ट्रीय स्तरावर आयसोलेशन होत असल्याचा दावाही यावेळी त्यांनी केला.

# महायुतीच्या उमेदवार पंकजाताई मुंडे यांची रिपाई प्रदेशाध्यक्ष पप्पू कागदे यांच्या कार्यालयास भेट..!

**बीड । प्रतिनिधी**

**बीड लोकसभा मतदार संघात महायुतीच्या उमेदवार पंकजाताई गोपीनाथराव मुंडे यांनी काल रिपाई प्रदेशाध्यक्ष पप्पू कागदे यांच्या शहरातील जन संपर्क कार्यालयातील भेट दिली. त्यावेळी उपस्थतीत सर्व पदाधीकाऱ्यांनी त्यांचा यथोचित सत्कार केला.**

रिपाईचे संस्थापक अध्यक्ष तथा केंद्रीय मंत्री ना. रामदास आठवले माहायुतीचे घटक पक्ष म्हणून सोबत काम करत असून, लोकसभा निवडणूक प्रचारात राज्यात त्यांचा झंझावती दौरा सुरू आहे. बीड लोकसभा मतदार संघात महायुतीचे सर्व घटक पक्ष पंकजाताईच्या विजयासाठी परिश्रम घेत असून काल उमेदवार पंकजाताई मुंडे यांनी शहरात रिपाई युवा प्रदेश अध्यक्ष पप्पू कागदे यांच्या संपर्क कार्यालयात भेट देऊन प्रमुख कार्यकर्त्यांशी सू-संवाद साधला. सुरवातीला पप्पू कागदे यांनी



पुष्पहार घालून उमेदवाराचे स्वागत केले. यावेळी राजू जोगदंड जिल्हा सरचिटणीस, किसन चांगडे, किशोर कांडेकर, अविनाश जावळे, महादेव उजगरे, सचिन कागदे, दशरथ सोनवणे, दीपक कांबळे, अशोक साळवे, अरुण भालेराव, नरेंद्र जावळे, अरुण निकाळजे, गोवर्धन वाघमारे, उत्तम मस्के, मायाताई मिसळे, दशरथ शिंदे, सादीक कुरेशी, संदीपान डोंगरे, अजित सिरसट, भगवान ससाणे, बंटी गायसमुद्रे, बबन मस्के, आदि प्रमुख कार्यकर्त्यांची उपस्थिती होती.

# सुनीता विल्यम्स आज तिसऱ्यांदा घेणार अंतराळात झेप

## भगवद्गीता अन् गणेश मूर्ती नेणार सोबत

**नवी दिल्ली । वृतसंस्था**



**भारतीय वंशाची अंतराळवीर सुनीता विल्यम्स ही मंगळवारी (दि.७) तिसऱ्यांदा अवकाशामध्ये झेप घेणार असून, याहीवेळेस ती भगवद्गीता आणि गणपतीची छोटी मूर्ती सोबत नेणार आहे.**

केनेडी स्पेस सेंटर येथून बोइंग स्टार लाइनर हे नवो अंतराळयान सुनीताला घेऊन सकाळी आठच्या सुमारास उड्डाण करेल, अशी माहिती सूत्रांनी दिली. ''गणपतीची मूर्ती माझ्यासाठी लकी असल्याने मी ती सोबत नेते आहे, ही खरोखरच माझ्यासाठी आनंदाची बाब आहे.'' याआधीच्या अंतराळ सफरीवर जातानाही सुनीताने भगवद्गीता आणि गणेश मूर्ती सोबत नेली होती. सुनीताच्या नावावर काही विक्रमांची याआधीच नोंद झाली आहे. सर्वाधिक काळ स्पेसवॉक करणारी ती महिला अंतराळवीर ठरली आहे. आतापर्यंत तिने सातवेळी स्पेसवॉक केला असून त्याचा कालावधी हा साधारणपणे ५० तास ४० मिनिटे एवढा आहे.

# शरीरासारखेच मनही पडते आजारी

**मित्रांनो आपण डॉक्टर कडे कधी जातो? आपलं शरीर काही कारणामुळे आजारी पडते तेव्हा ना ! आपल्या सर्वांनाच माहित आहे की जसे वातावरनात बदल झाला किंवा चुकीच्या सवयी, चुकीचा आहार व व्यायामाचा अभाव त्यामुळे काही साथींचे व संपर्कजन्य आजार सुद्धा दिसून येतात. मग आपण व आपल्या कुटुंबातील व्यक्ती जर आजारी पडली तर आपण हॉस्पिटलमध्ये जातो जेव्हा आपल्याला त्रास होतो आपल्या शारीरिक वेदना असाह्य होतात.जसे की डोकं जड होणे, पित्त होणे, अर्धशिशी होने,सर्दी-ताप, जुलाब, कंबर दुखी, पाठ दुखी, गुडघेदुखी, हात हातपाय गळून, जाणे चक्कर येणे बीपी, शुगर, अस्थमा, पोटाचे आजार असे अनेक शारीरिक लक्षणे व्यक्तीमध्ये दिसून येतात. तेव्हा आपण लगेच हॉस्पिटलमध्ये डॉक्टरांकडे जातो. योग्य तो औषधोपचार घेतो आराम घेतो सांगितल्याप्रमाणे आहार घेतो. दिलेली ट्रीटमेंट व्यवस्थित पार पाडतो.**

याच पद्धतीने आपले मन आजारी पडते ही संकल्पनाच आपल्याला रुजत नाही. आपलं मन कुठे आजारी पडत असते का? कारण आपण सहसा आपल्या मनाचा आपण कधी विचारच केलेला नाही. कारण आत्तापर्यंत शारीरिक आजाराचे हे मानसिकतेचे प्रतिबिंबच आहे. हे आपल्याला माहित नसावे किंवा आपल्या समाजामध्ये व्यक्ती हे मान्यच करत नाही की माझं मन आजारी आहे. आपलं मन जेव्हा आजारी पडते तेव्हा आपोआपच व्यक्तीमध्ये खालील लक्षणे धजाणवतात. अगदी मोठे मोठे आजार सुद्धा याच मानसिकतेचे प्रतीक आहेत.आपले अस्तित्व निर्माण करत असताना जगण्याची पद्धती, विचारसरणी, आपली दिनचर्या,आपण दुसऱ्याचा कशाप्रकारे विचार करतो. या सगळ्या गोष्टी जर नकारात्मक व चुकीच्या असतील तर आपल्याला मनाचे आजार नक्कीच उद्भवतात. मन जेव्हा आजारी पडते तेव्हा मनामध्ये सतत नकारात्मक विचार येऊन सतत आळस येणे, उदास वाटणे, अस्वस्थ व बेचैनी होणे, दैनंदिन कामामध्ये मन न लागणे, योग्य निर्णय घेता न येणे,जेवणाची इच्छा असूनही जेवण न जाने,झोपेच्या तक्रारी, वारंवार बाथरूमला जाणे किंवा जावेसे वाटणे, टेन्शन आलं की भीती वाटते, पोटात गोळा येतो, बारीक ताप आल्यासारखा वाटतो, छातीत जळजळ होते, पोटामध्ये गॅसेस किंवा गोळा आल्यासारखं होणे ,अति राग राग करणे, सतत चिडचिड करणे, सतत भावनिक होणे, पुन्हा पुन्हा हार्टबीट वाढणे,श्वासोच्छ्वास वाढणे. थरकाप सुरू होणे, हातापायाला मुंग्या येणे, स्नायू आखणे, मान खांदे जड पडणे, तोंड कोरडे पडणे, गोड खावेसे वाटणे , सतत झोपून राहावंसं वाटणे, कोणत्या कामामध्ये उत्साह न वाटणे, सतत रडू येणे, टेन्शनमध्ये जीवन जगणे, अपराधी आणि एकटे वाटणे, नशिबाला दोष देणे, त्रासाच्या वेदना सहन होत नसल्याने व्यसन आणि आत्महत्या सारखे विचार येणे, वरील लक्षणापैकी सहा ते आठ लक्षणे जर व्यक्तीमध्ये दिसून येत असतील तर आपले मन आजारी पडलेले आहे. त्याला योग्य उपचाराची गरज आहे म्हणजेच आपलं समुपदेशन करण्याची गरज आहे. असे एक ना अनेक लक्षणे मन आजारी पडल्यावर दिसून येत असतात. या लक्षणांची उच्च पातळी झाली तर! गंभीर मानसिक व शारीरिक आजाराला तोंड द्यावे लागते. जसे शारीरिक आजारावर लगेच आपण उपचार करतो तसेच मनावरही उपचार करणे गरजेचे आहे तेव्हाच आपले मन शारीरिक व मानसिक आजारांना आपल्या जवळ येऊ देणार नाही. अशाच प्रकारच्या विविध विषयावरील माहितीसाठी व समुपदेशनासाठी संपर्क साधू शकता.



समुपदेशक:::--
**मनीषा बिक्कड (घुले)**
मो.९५४५४४०४७१, ९३७०२७४६७५
मेंदू विज्ञानावर आधारित मानसशास्त्रीय उपचारक

## पान १वरून...

### वातावरण फिरणार;

समाजासह मुस्लिम आणि मागासवर्गीय समाज असल्याचा दावा केला आहे. पंकजाताई मुंडे यांना अनेक गावात मराठा तरुणांचा रोष पत्कारावा लागला आहे. नाही म्हटले तरी या निवडणुकीला जातीय रंग आला असून पंतप्रधान नरेंद्र मोदी यांची सभा पंकजाताई मुंडे यांच्यासाठी बळ देणारी ठरणार आहे. दि. ७ मे रोजी आंबाजोगाई येथे मोदींची जाहीर सभा होणार असून परळी, माजलगाव, धारूर, केज आणि आंबाजोगाई या तालुक्यातील मतदारांवर मोदींच्या सभेचा प्रभाव पडणार आहे. मोदींची गॅरंटी आणि सबका साथ सबका विकास यासह मोदी हे मराठा समाजासह इतर सर्व समाजासाठी काही घोषणा आणि आश्वासने देऊ शकतात, त्यामुळे बीड लोकसभा मतदारसंघातील राजकीय वातावरण फिरणार असून पंकजाताई मुंडे यांच्या विजयाचा मार्ग सुकर होणार असल्याचे म्हटले जात आहे. तसेच सभेत मोदी हे पंकजाताई यांना मंत्रीपद देण्याबाबतही संकेत देऊ शकतात, असे म्हटले जात असून त्यानंतर जिल्ह्याला मंत्रीपद मिळणार असल्याने पंकजाताई यांच्या पाठीशी खंबीरपणे उभी राहील, असे दिसते.

--------------

### आरक्षणाबाबत राहुल गांधींच्या

हे मोदींवर धादांत खोटे आरोप करित आहेत. दलित बहुजन जनतेत संभ्रम आणि भिती निमार्ण करण्याचे काम राहुल गांधी करीत आहेत. याची दखल निवडणूक आयोगाने घ्यावी, ईमेल पाठवून ही तक्रार करणार असल्याचे आठवले यांनी सांगीतले आहे. रिपाइंचे तेलंगणा प्रदेश अध्यक्ष रविकुमार पसुला हे वरंगल या अनुसुचित जातीसाठी राखीव लोकसभा मतदार संघात पक्षाच्या वतीने निवडणुक लढत आहेत. तर तेंलगणात १६ जागांवर भाजपला पक्षाचा पाठींबा आहे.

--------------

### मोदींची हुकूमशाही गाडण्यासाठी

शरदचंद्र पवार पक्षाचे प्रदेशाध्यक्ष जयंत पाटील, खासदार अमोल कोल्हे, महाविकास आघाडीचे उमेदवार बजरंग सोनवणे,शिवसेना उध्दव बाळासाहेब ठाकरे पक्षाचे जिल्हाप्रमुख परमेश्वर सातपुते, आमदार संदीप क्षीरसागर, माजी आमदार सय्यद सलीम,माजी आमदार साहेबराव दरेकर, माजी आमदार लोकसभा प्रमुख सुनील धांडे,जैष्ट नेत्या सुशीला मोराळे यांच्या प्रमुख उपस्थितीत आष्टी शहरातील ईदगाह मैदानावर जाहीर सभा आयोजित करण्यात आली होती. याप्रसंगी बोलताना शिवसेना जिल्हाप्रमुख परमेश्वर सातपुते म्हणाले की केंद्रातील मोदी शहा आणि राज्यातील मींधे सरकार ला लोकसभा निवडणुकीत पराभव समोर दिसत असल्यामुळे त्यांच्या पाया खालची वाळू सरकली आहे मोदीजी प्रत्येक भाषणात म्हणतात ''मेरा देश मेरा परिवार '' पण त्यांच्याच परिवारातील कर्नाटक येथील उमेदवार, रेवाण्णा यांनी ३००० महीलाचे शोषण करून अत्याचार केले त्याचे व्हिडिओ काढले त्यांना मोदी सरकारने बाहेर देशात पळून जायला मदत केली त्यावर मोदी शहा काही बोलत नाही सत्तेसाठी भाजप खालच्या थराला जातेय, शेतकऱ्यांच्या मालाला योग्य भाव नाही सोयाबीन कापूस घरात ठेवलेलं आहे शेतकऱ्यांच्या गरजू वस्तूवर २८% जीएसटी लावून प्रचंड भाव वाढ केली खताच्या किमतीत भाव वाढ करून शेतकऱ्यांना देशोधडीला लावण्याचे काम मोदी सरकारने केले आहे राज्यातील जे नेते इमानदारीने आणि प्रामाणिकपणे काम करीत होते अशा नेत्यांच्या पाठीमागे ईडीसीबीआय आणि इन्कम टॅक्स धाडी टाकून त्यांना वेटीस धरण्याचा आणि त्रास देण्याचे काम मोदी सरकारने आणि मिंधे सरकारने केले.सर्व जाती धर्मांना बरोबर घेऊन महाविकास आघाडीचे उमेदवार बजरंग सोनवणे हे काम करत आहेत पालकमंत्री मुंडे आणि मुंडे भगिनी बीड जिल्हा च्या विकासासाठी मते मागत फिरत आहे पण बीड जिल्ह्यातील सत्ता गेल्या वीस वर्षांपासून त्यांच्या कडेच आहे मग तेंव्हा विकास का करता आला नाही याचे उत्तर त्यांनी दिले पाहिजे बोलाचाच भात आणि बोलाचीच कढी अशी अवस्था त्यांची झाली आहे बीड जिल्ह्यातील जनता आता त्यांच्या भूलथापांना भूलनार नाही त्यामुळे यावेळेस शेतकऱ्यांनी व जिल्ह्यातील जनतेने महाविकास आघाडी चे नेते शरदचंद्रजी पवार साहेब व शिवसेना पक्षप्रमुख उद्धवजी ठाकरे साहेब यांच्या पाठीशी उभे राहून बीड जिल्ह्यातील लोकसभा उमेदवार बजरंग बप्पा सोनवणे यांना प्रचंड मताधिक्याने विजयी करावे असे आवाहन त्यांनी यावेळी केले.

---------------

### जात निहाय जनगणना करून

आष्टी येथे प्रदेशाध्यक्ष जयंत पाटील आणि प्रवक्ते अमोल कोल्हे यांची जाहीर सभा पार पडली. या सभेला प्रदेशाध्यक्ष जयंत पाटील, अमोल कोल्हे, उमेदवार बजरंग सोनवणे, निरीक्षक जीवनराव गोरे, युवा राष्ट्रवादीचे प्रदेशाध्यक्ष महबूब शेख यांच्यासह जिल्हाध्यक्ष तथा आमदार संदीप क्षीरसागर, माजी आमदार साहेबराव नाना दरेकर, माजी आमदार सय्यद सलीम, माजी आमदार सुनील धांडे, माजी आमदार उषाताई दराडे, सुशीलाताई मोराळे, बबन गीते, परमेश्वर सातपुते, राम खाडे, कॉ. महादेव नागरगोजे, अजिंक्य चांदणे, ॲड हेमा पिंपळे, दीपक केदार, अण्णासाहेब केदार, गणेश कवडे हे उपस्थित होते. यावेळी बोलताना जयंत पाटील म्हणाले की, देशात प्रचंड महागाई वाढलेले असून शेतकऱ्यांना दिल्या जाणाऱ्या सन्मान योजनेचे सहा हजार रुपयांच्या नावाखाली प्रचंड लूट केली जाते. प्रत्येक बाबीवर जीएसटीद्वारे लूट केली जातेय. गॅस, इंधन व जीवनावश्यक वस्तूंचे भाव गगनाला भिडलेले आहेत. खते , बी बियाणे व कीटकनाशके यांच्या किमती बेसुमार वाढलेल्या आहेत. त्यामुळे महागाईने उच्चांक गाठला असताना मात्र शेतकऱ्यांच्या शेतमालाला सरकारच्या चुकीच्या धोरणामुळे भाव नाही. हे सरकार व्यापारी आणि भांडवलदार धार्जिणे सरकार आहे. असा आरोप त्यांनी केला. तसेच त्यांनी महविकास आघाडी सरकारच्या काळात जलसिंचनाच्या कामांना दिलेल्या मंजुरी दिली. त्यांचे सरकार आल्यास जिल्ह्याला पाणी दिले जाईल. गरीब कुटुंबांमध्ये महिलांना दर वर्षाला एक लाख रू दिले जाईल आणि पदवी व पदविका धारकांना वर्षाला एक लाख रु देण्याचा उल्लेख जाहीरनाम्यात आहे. तसेच राज्यात जातीनिहाय जनगणना करून आरक्षणाची ५०% ची मर्यादा वाढवून कुणबी मराठा, धनगर, मुस्लिम व ओबीसी यांना आरक्षण देवू. असेही ते म्हणाले. संविधान बदलण्याचा डाव हाणून पाडा असे म्हणाले. राष्ट्रवादी काँग्रेस शरदचंद्र पवार पक्ष आणि महाविकास आघाडीचे उमेदवार बजरंग सोनवणे यांच्या धास्तीमुळे भाजपला पंतप्रधान यांना बोलवावे लागत आहे. यातच बजरंग सोनवणे यांचा विजय निश्चित असून राज्यात महाविकास आघाडीच्या ३० ते३५ जागेवर विजय निश्चित असल्याचा आत्मविश्वास जयंत पाटील यांनी व्यक्त केला. डॉ. अमोल कोल्हे म्हणाले की, म्हणाले की लोक पूर्वी घरावर दरोडा टाकायचे पण भाजपवाले आता पक्षावर दरोडा टाकू लागले आहेत. त्यामुळे आता स्वार्थासाठी सरपटत जायचं की स्वाभिमान जपण्यासाठी लढायच! हे ठरवा असे आव्हान त्यांनी केले. तर पंतप्रधानांनी देशवासीयांच्या अपेक्षाभंग केला असे अशी टीका केली. तसेच या वेळी राष्ट्रवादीचे युवा प्रदेशाध्यक्ष महेबुब शेख म्हणाले की, राज्यात आणि देशात आमचे सरकार येणार असून अधिकारी वर्गाने याचा विचार करावा. अशी तंबी दिली. तसेच पालकमंत्र्याचे नाव न घेता म्हणाले की, हे पालकमंत्री आहेत की मालकमंत्री आहेत ? महाविकास आघाडीचे उमेदवार बजरंग सोनवणे यांनीही भाजपचा समाचार घेताना म्हंटले की, पालकमंत्री हे सरपंचांना निधीच्या नावाखाली धमकवित आहेत. त्याचा निषेध व्यक्त केला. तर एका उमेदवाराला त्याचा उमेदवारी अर्ज मागे घेण्यासाठी उमेदवाराने धमक्या दिल्याच्या क्लिप व्हायला झाल्या आहेत. त्याचे तक्रार निवडणूक आयोगाकडे करण्यात येणार आहे. तसेच ते शेतकरीपुत्र आहेत. आम्ही गरीब म्हणून जर कोणी आमच्या सारख्या गरीबांची औकात आणि लायकी काढीत असेल; तर जिल्ह्यातील जनताच नेत्यांचे प्रारब्ध ठरविते. नेते जरी एका बाजूला असेल तरी सामान्य मतदार आमच्या बाजूने आहे. ही निवडणूक नेत्यांनी नव्हे तर जनतेनी हातात घेतली आहे. त्यामुळे विजय निश्चित असून निवडून आल्यास मराठा, धनगर, मुस्लिम, ओबीसी आरक्षणासाठी खंबीरपणे सोबत राहून संसदेत आवाज उठविण. तसेच कायम संविधानाच्या रक्षणासाठी लढेन. असे आश्वासन दिले. या सभेत जिल्हाध्यक्ष आमदार संदीप क्षिरसागर, माजी आमदार साहेबराव नाना दरेकर, शिवसेना जिल्हाप्रमुख परमेश्वर सातपुते, विधानसभा प्रमुख राम खाडे, ॲड. हेमा पिंपळे, डीपीआयचे अजिंक्य चांदणे, ऑल इंडिया पँथरचे दिपकभाई केदार यांचीही भाषणे झाली. यावेळी मतदारांनी प्रचंड गर्दी केली होती त्यामुळे भाजपला शह देण्यात महाविकास आघाडी यशस्वी झाली असून विजय पक्का आहे.

---------------------------

### प्रकाश आंबेडकर

बीड शहरामध्ये प्रकाश आंबेडकर यांची जाहीर सभा होणार असून या सभेमुळे अशोक हिंगे पाटील यांचा विजय निवडणुकीपूर्वीच निश्चित होणार असल्याचा विश्वास नागरिक व्यक्त करीत आहेत. बीड शहरात होत असलेल्या या जाहीर सभेसाठी वंचित बहुजन आघाडीचे बीड जिल्ह्यातील सर्व तालुक्यातील पदाधिकारी आणि कार्यकर्ते परिश्रम घेत आहेत. रेकॉर्ड ब्रेक होणाऱ्या या सभेसाठी बीड लोकसभा मतदारसंघातील वंचित बहुजन आघाडीचे पदाधिकारी, कार्यकर्ते आणि मतदार नागरिकांनी मोठ्या संख्येने उपस्थित राहावे असे आवाहन अशोक हिंगे पाटील यांनी केले आहे.

**पथनाट्यच्या माध्यमातून होत आहे मतदार जागृतीचा उपक्रम**

वंचित बहुजन आघाडीचे बीड लोकसभेचे अधिकृत उमेदवार अशोक हिंगे पाटील यांच्या प्रचारार्थ गावागावांमध्ये प्रचार रथ, बॅनर, पोम्प्लेट मतदारापर्यंत पोहोचविले जात असून पथनाट्याच्या माध्यमातून मतदार नागरिकांमध्ये जागृती करण्यात येत आहे. वंचित बहुजन आघाडीला मतदान म्हणजेच विकासाला मतदान हे मतदार नागरिकांच्या मनावर बिंबविले जात असून या माध्यमातून अनेक मतदारांचे मन परिवर्तन करण्याचे उपक्रम वंचित बहुजन आघाडीच्या माध्यमातून होत आहे.

------------

दैनिक राज्य लोकतंत्र
नवी दिशा... नवे विचार.....


## संतोष मोटे यांचा वाढदिवस सावली अनाथ आश्रमाच्या मुलांसोबत साजरा



**म्हसोबावाडी । प्रतिनिधी**

आष्टी तालुक्यातील कडा या शहरातले सेलिब्रिटी इव्हेंट असणाऱ्या संतोष मोटे (पाटील) हे नेहमीच चर्चेत आहेत काल त्यांचा वाढदिवस झाला अन्? हा वाढदिवस व्यर्थ खर्च टाळुन म्हणजे सावली अनाथ आश्रम येथे संतोष मोटे यांचा तेथे असणाऱ्या मुलांसोबत वाढदिवस साजरा झाला या वेळी त्यांनी मुलांसोबत केक कापून त्यांना अल्प आहार देऊन वाढदिवस साजरा केला या वेळी महाराष्ट्र काव्य सम्राट कवी प्रेम पवळ, म्हसोबावाडी/सेवालाल ग्रामपंचायत उपसरपंच अनिल शेकडे, अशोक खोरदे , विशाल सांगळे सह सर्व सावली अनाथ अश्राम केडगाव (अ.नगर) येथील कर्मचारी उपस्थित होते.

# दोनशे कोटीला गंडा घालणारा जिजाऊ मल्टीस्टेटचा ठग बबन शिंदे अद्याप फरार

### सहकार आयुक्तांचा सीईओ वर ७३.४६ कोटी गैरव्यवहाराचा ठपका; सीईओ व संचालकांना मिळाला जामीन

**बीड । प्रतिनिधी**

जिजाऊ माँसाहेब मल्टीस्टेट बीड ठेवीदारांची नियोजन बध्द फसवणूक करून २०० कोटींचा गंडा घालणारा मुख्य सुत्रधार बबन शिंदे अद्याप फरार असुन पथक त्याला अटक करू शकलं नाही.सहकार आयुक्तांनी मल्टीस्टेटच्या सीईओ आणि संचालकांवर स्पष्टपणे ७३.४६ कोटी गैरव्यवहाराचा ठपका ठेवला तरी त्यांची कसून चौकशी करण्यात आली नाही.उलट त्यांना जामीन मिळाल्या. ठेवीदारांनी आंदोलन केल्यानंतर एसआयटी ची नेमणूक केली, परंतु त्यांच्याकडून कोणतीही ठोस कारवाई झाली नाही.

महाराष्ट्र प्रोटेक्शन ऑफ इंटरेस्ट ऑफ डिपॉजिटर्स (एमपीआईडी) एक्ट, १९९९ अंतर्गत तयार केलेला प्रस्तावअपूर्ण आहे. सीईओ संचालक मंडळाच्या मालमत्ता तपासल्या नाहीत. राज्यातील मालमत्ता शोधल्या नाहीत. न्याय देण्यासाठी जिल्हा प्रशासन दिरंगाई करत आहे. मोर्चा, धरणे ,आंदोलने करून ठेवीदारांनी संताप व्यक्त करून कारवाईची मागणी केली. आज वर्ष उलटून गेले तरी या घोटाळ्याकडे कोणीच कसे गांभीर्याने पाहत नाही. मोदी साहेब आपण तरी बीड जिल्ह्यातील १६ हजार सभासदांचे मायबाप व्हा.आणि आम्हाला न्याय द्या.अशी पोटतिडकीची मागणी अडकलेले ठेवीदार मारुती तिपाले शेख कुतुब यांनी केली आहे. जिजाऊ मल्टीस्टेटला भारत सरकारची परवानगी आहे. म्हणूनच विश्वासाने जनतेने मल्टीस्टेट मध्ये पैसा ठेवला ही नागरिकांची चूक नाही. अनेक अधिकारी म्हणतात तुम्ही विचार करून पैसे टाकायला पाहिजे. सरकारच्या परवानगीने चालणाऱ्या मल्टीस्टेट मध्ये पैसा ठेवणे ही आमची चूक नाही. केंद्र सरकार, राज्य सहकार आयुक्त, मुख्यमंत्री, गृहमंत्री, राज्याचे वरिष्ठ पोलीस अधिकारी, जिल्हाधिकारी, पोलीस अधीक्षक यांच्या सह सर्वांकडे ठेवीदारांनी साकडे घातले आहे. ठेविदार बांधव वर्गणी करून न्यायालयात लढा देत आहेत. ठेवीदारांच्या बाजूने प्रशासनाने भक्कमपणे उभा राहून न्याय देण्याऐवजी ठेवीदारांची हेटाळणी करण्याचे काम अधिकारी करत आहेत. बीड जिल्ह्यामधील अनेक मल्टीस्टेट मुळे ठेवीदारांची प्रचंड हानी झाली आहे, मल्टीस्टेट घोटाळ्याचा विषय गांभीर्याने घेऊन आम्हाला न्याय दिलाच पाहिजे. जिजाऊ मल्टीस्टेट घोटाळ्याचा पाठपुरावा करण्यासाठी ठेवीदार बांधव एकत्रितपणे चिकाटीने लढा देत आहेत. कायदेशीर मार्गाने आम्हाला न्याय द्यावा.अशी मागणी ठेवीदारांनी केली आहे.

## पटेल शुज कंपनीच्या वतिने मतदान जनजागृती अभियान

**माजलगाव । प्रतिनिधी**

माजलगाव येथील चप्पल बुटाचे पटेल शु.कं. या भव्य शोरुम च्या वतिने १३ मे रोजी होऊ घातलेल्या लोकसभा निवडणुकीच्या मतदानाच्या अनुषंगाने लोकशाही बळकट करण्यासाठी परिसरातील नागरिकांनी मतदान करावे यासाठी मतदान जनजागृती करण्याचे डिजीटल फलक आपल्या शो रुम मध्ये तसेच शो रुमच्या बाहेरील परिसरात लावुन जनजागृती करण्यात येत आहे.




मतदान हे आपले कर्तव्य आहे आपण केलेल्या मतदानातुन आपल्या देशाचे भविष्य लिहिले जाणार आहे.मतदान न करता फिरायला जाणे,आपल्या एका मताने काय होणार आहे ? असे बोलणे व भविष्यात हेच लोक आपल्या देशात काही होऊ शकते असे नकारात्मक बोलुण आपल्याला जो लोकशाही बकळट करण्यासाठी दिलेल्या अधिकाराच्या बाबतीत उदासीनता दिसुन येते आहे.मतदानाची टक्केवारी दिवसन दिवस कमी होताना दिसत आहे. हिच गोष्ट लक्षात घेवुन पटेल शु.कं. च्या वतिने आपल्या दुकानात खरेदी करण्यासाठी येणार्या ग्राहकांना व इतर लोकांना मतदानासाठी प्रोत्साहीत करण्यासाठी डिजीटल फलक लावुन जागृती करण्यात येत आहे. पटेल शु.कं. चे संचालक इम्रान खान व अबुल हश्मी यांनी जगातील सर्वात मोठ्या लोकशाहीला बळकट करण्यासाठी मतदान करण्याचे अवहान केले आहे.

## जीवनातील निराशा टाळण्यासाठी समाज माध्यमाचा वापर हुशारीने करावा-प्रा.जाधव

**अंबाजोगाई । प्रतिनिधी**

आजच्या काळात समाज माध्यमे संमोहनाचे,जादूचे काम करीत आहेत ते महिलांच्या मनाचा ताबा घेतात त्यामुळे अनेक समस्या निर्माण होत आहेत महिलांनी समाज माध्यमांचा वापर दृष्टेपणाने केला पाहिजे असे प्रतिपादन छ. संभाजी नगर येथील प्रा. समिता जाधव यांनी केले येथील श्री योगेश्वरी शिक्षण संस्थेच्या योगेश्वरी क्रीडा प्रबोधिनी, श्रीमती कमल खुरसाळे स्मृती न्यास.व स्वामी रामानंद तीर्थ महाविद्यालयाच्या वतीने आयोजित १५ व्या महिला आत्मभान प्रशिक्षण शिबीराच्या कार्यक्रमात प्रा. समिता जाधव यांनी अनेक उदाहरणे सांगून मुलींनी सोशल मीडियावर सजग राहून आपली फसवणूक होणार नाही याकडे लक्ष दिले पाहिजे असे मत व्यक्त केले . आजकाल सर्वच दोन प्रकारचे जीवन जगतात वास्तवात व आभासी. तरुण पिढी सोशल मिडियाच्या आहारी जात आहे त्यामुळे ताण तणाव निर्माण होत आहेत. अनैसर्गिक गोष्टी माध्यमांच्या द्वारे लादल्या जात आहेत मुलींनी , महिलांनी यात न अडकण्या साठी व जीवनात येणारी निराशा टाळण्यासाठी हुशारीने समाज माध्यमांचा वापर करावा असे आवाहन समिता जाधव यांनी केले . मुलींनी आपण कसे दिसतो यापेक्षा आपण कसे आहोत याला महत्त्व दिले पाहिजे. मुली, महिला स्वतः चे वस्तूकरण करीत आहेत हे योग्य नाही असे मत त्यांनी व्यक्त केले. या कार्यक्रमाचा अध्यक्षीय समारोप योगेश्वरी



शिक्षण संस्थेच्या संचालिका, अंबाजोगाईतील प्रसिद्ध विधिज्ञ, कल्याणीताई विर्धे यांनी केला. आपल्या संबोधनात समाज माध्यमे,प्रसार माध्यमांकडे डोळसपणे पाहिले पाहिजे असे मत व्यक्त केले. समाज माध्यमांचा वापर आपण कसा करतो यावर बरेच अवलंबून असते. महिलांनी सोशल मीडियावर सजग, सतर्क राहावे असे आवाहन त्यांनी केले. मुलींनी सर्वच शेअर करावे असे नाही . समाज माध्यमे एका बाजूला वरदान असले तरी कांहीं वेळेला शाप देखील ठरत आहेत त्यामुळे समाज माध्यमांचा योग्य पद्धतीने वापर करावा असे आवाहन कल्याणी विर्धे यांनी केले. या कार्यक्रमाचे संचालन व आभार शिबिरातील मुलींनी मानले. या कार्यक्रमाला योगेश्वरी शिक्षण संस्थेचे मा. अध्यक्ष डॉ. सुरेश खुरसाळे, सहसचिव प्रा. एन. के. गोळे गावकर, योगेश्वरी क्रीडा प्रबोधिनीचे समन्वयक प्राचार्य भिमाशंकर शेटे यांच्यासह कर्मचारी उपस्थित होते.

## इर्टीगा कारने गिरवलीच्या तरूणास उडविले; जखमी तरूणाचा उपचारा दरम्यान मृत्यू

**अंबाजोगाई । प्रतिनिधी**

अंबाजोगाई शहरामध्ये देशाचे पंतप्रधान नरेंद्र मोदी यांची सभा होणार असल्यामुळे बीडच्या पोलिस अधिक्षक कार्यालयातून निघालेली इर्टीगा लोखंडीच्या वाय पाईंटवर भरधाव वेगात येणार्या कारने प्रातविधीसाठी रस्त्याच्या कडेला थांबलेल्या तरूणाला भरधाव वेगातील कारने उडविले. या अपघातात कार महामार्गाच्या खाली जावून पलटी झाली. त्यातील पोलिसांनी जखमी तरूणाला स्वाराती रूग्णालयात उपचारासाठी दाखल केले असता. रविवारी रात्री ११ वाजता त्याचा उपचारादरम्यान मृत्यू झाला. मृत पावलेल्या तरूणाचे नाव हनुमंत महादेव पवार रा.गिरवली वय वर्षे ३३ असे आहे.

अंबाजोगाई तालुक्यातील गिरवली (बावणे) येथील हनुमंत महादेव पवार वय ३३ हा लग्नसमारंभातील बँन्डच्या समोर पीयानो वाजविण्याचे काम करत होता. रविवारी बनसारोळा येथे लग्न समारंभ आटोपून मोटार सायकल क्रं .एम.एच.३८ ए.८०९१ या दुचाकीवरून गावाकडे येत होता. लोखंडीच्या वाय पॉईंटवर प्रातविधिसाठी थांबला असता बीडकडून येणारी एम.एच.२३.ए.एस.००१९ मारोती इर्टीगा पोलिस अधिक्षक कार्यालयातील हेडकॉटरची गाडी भरधाव वेगात येणार्या कारने त्याला जोराची धडक दिली. या धडकेत तो गंभीर स्वरूपात जखमी झाला. पोलिसांची गाडी वेगात असल्यामुळे रस्त्या लगत असलेल्या खड्डयात जावून कोसळली त्यातील पोलिसांनी जखमी तरूणास स्वामी रामानंद तीर्थ रूग्णालयात दाखल केले. उपचारादरम्यान हनुमंत पवार रविवारी रात्री ११ वाजता त्याचा मृत्यू झाला. अपघातात मृत पावलेल्याचे चुलते मारोती विश्वंभर पवार यांनी अंबाजोगाई ग्रामिण पोलिस ठाण्यात पोलिस हेडकॉर्टरच्या गाडी चालकाविरूद्ध गुन्हा दाखल केला आहे. हनुमंत पवार याच्या पश्चात आई, पत्नी, दोन वर्षाची मुलगी, पाच वर्षाचा मुलगा, भाऊ व बहिण असा परिवार आहे. हनुमंत पवार याच्यावरच कुटूंबाचा उदरनिर्वाह होता. त्याचे अपघाती निधन झाल्यामुळे हे कुटूंब उघड्यावर पडले आहे. अंबाजोगाई ग्रामिण पोलिस ठाण्यात होडकॉर्टरचे कारचालक विजय गोरे याच्यावर गुन्हा दाखल झाला आहे. अधिक तपास पोलिस उपनिरिक्षक रंगनाथ जगताप हे करत आहेत.

### सहा महिन्यापुर्वीच मयताच्या वडिलांचा मृत्यू

हनुमंत पवार यांचे वडील महादेव यांचा सहा महिन्यापुर्वीच आजारादरम्यान मृत्यू झाला असून त्यामुळे घराची जबाबदारी हनुमंतवर होती. अंबाजोगाई तालुक्यात तो उत्कृष्ठ पीयाने वादक म्हणून त्याची ओळख होती. या कलेतूनच तो त्याचे कुटूंब चालवत होता. त्याच्या अपघाती निधनामुळे तालुक्यामध्ये हळहळ व्यक्त केली जात आहे.

## राज्यस्तरीय तायक्वांदो स्पर्धेत बीडच्या खेळाडूंची १२ पदकांची कमाई







### स्वराज घोडके, कल्याणी घुगे यांना २ सुवर्णपदके

**बीड । प्रतिनिधी**

रत्नागिरी येथे पार पडलेल्या ४ थ्या राज्यस्तरीय ओपन तायक्वांदो स्पर्धेत बीडच्या खेळाडूंनी २ सुवर्ण, ५ रौप्य व ५ कांस्य अशी १२ पदके जिंकली आहेत, अशी माहिती महाराष्ट्र संघटनेचे अध्यक्ष तथा राष्ट्रीय प्रशिक्षक डॉ. अविनाश बारगजे यांनी दिली आहे .

तायक्वांदो असोसिएशन ऑफ महाराष्ट्र, मुंबई संघटनेच्या मान्यतेने रत्नागिरी जिल्हा तायक्वांदो स्पोर्ट्स असोसिएशन आयोजित ४ थी महाराष्ट्र राज्य खुल्या तायक्वांदो स्पर्धा २९ एप्रिल ते १ मे २०२४ दरम्यान पार पडली. या स्पर्धेत महाराष्ट्रातील कानाकोपऱ्यातून जवळपास ८०० हून अधिक खेळाडूंनी सहभाग नोंदवला. पुणे , ठाणे , रत्नागिरी या जिल्ह्यांसोबतच बीड जिल्हा संघाचे या स्पर्धेवर वर्चस्व राहिले. डॉ. अविनाश बारगजे यांच्या मार्गदर्शनाखाली या राज्यस्तरीय स्पर्धेत सहभागी बीड जिल्हा संघातील खेळाडूंनी घवघवीत यश संपादन केले आहे. मुलांच्या ४१ किलो वजन गटात स्वराज घोडके व मुलींमध्ये २९ किलो वजन गटात कल्याणी घुगे यांनी अंतिम फेरीत पुणे जिल्ह्याच्या मातब्बर खेळाडूना पराभूत करून २ सुवर्णपदके जिंकली आहेत. राष्ट्रीय खेळाडू सार्थक भाकरे, ऋत्विक तांदळे , सार्थक ठेंगल, प्रज्वल भाकरे, अर्णव शिंदे यांनी अंतिम फेरीपर्यंत मजल मारून ५ रौप्य पदके जिंकली तर बीडचा राष्ट्रीय खेळाडू देवेंद्र जोशी सह सुमित राऊत, अद्विक सानप, कृष्णा डाके , युवराज काळे यांनी ५ कांस्यपदके जिंकली आहेत. या स्पर्धेत सैनिकी विद्यालयाच्या वरद काळे ,पृथ्वीराज चव्हाण, पवत राऊत, यांच्यासह सौरभ घोडके , साई गडदे , सार्थक राख, ओम कासट, हर्षवर्धन पवार यांनी सहभाग नोंदवला. राष्ट्रीय प्रशिक्षक डॉक्टर अविनाश बारगजे यांच्या जिल्हा स्टेडियम येथील तायक्वांदो प्रशिक्षण केंद्रातील व सैनिकी विद्यालयाचे हे खेळाडू आहेत. या सर्व खेळाडूंना डॉ. भारतभूषण क्षीरसागर , डॉ योगेशभैया क्षीरसागर , जिल्हा संघटनेचे अध्यक्ष नितीनचंद्र कोटेचा , जिल्हा क्रीडा अधिकारी पंडित चव्हाण, योगेश करांडे, दिनकर चौरे, डॉ. अविनाश बारगजे ,जया बारगजे ,बन्सी राऊत, भरत पांचाळ , सुनील राऊत, डॉ . विनोदचंद्र पवार, मनेष बनकर, प्रसाद साहू , बालाजी कराड , नितीन आंधळे , जिल्हा संघटनेचे सर्व वरिष्ठ खेळाडू व सर्व पदाधिकारी यांनी अभिनंदन केले आहे.

## अक्षय तृतीयेच्या दिवशी बालविवाह होण्याची शक्यता;आढळल्यास गुन्हा दाखल होईल

**बीड । प्रतिनिधी**

''अक्षय तृतीया'' या दिवशी मोठ्या प्रमाणात बाल विवाह आयोजित होत असतात. जे कायद्याने गुन्हा आहे. बाल विवाह प्रतिबंधक अधिनियम २००६ संपुर्ण राज्यात लागू आहे. त्यानुसार बाल विवाह आयोजित करणे हा अजीमपात्र गुन्हा आहे.

''अक्षय तृतीया'' या दिवशी बाल विवाह होवू नये म्हणून आवश्यक त्या उपाय योजना शासना करीत आहे. बाल विवाह हि प्रथा बाल हक्काच्या विरोधी असून बाल विवाह प्रतिबंधक अधिनियम २००६ नुसार असे बाल विवाह बेकायदा ठरतात. या विरोधात गुन्हा नोंदविला जाणे अपेक्षीत आहे. तसेच सदर कायद्याच्या अमलबजावणी संदर्भात महिला व बाल विकास प्रकल्प अधिकारी यांना बाल विवाह प्रतिबंधक अधिकारी म्हणून नियुक्त करण्यात आलेले आहे. त्या अनुषंगाने यंत्रणानी / विभागाने / कार्यालय यांनी आपल्या अधिकार क्षेत्रात (ग्राम / तालुका व जिल्हास्तरावर) बाल विवाह होवू



नये यासाठी जाणिव जागृती कार्यक्रम, प्रशिक्षण, रॅली, इ. प्रतिबंधात्मक उपाय योजना कराव्यात. बाल विवाहाचे आयोजन करणारे वधु व वर यांचे आई वडिल, नातेवाईक, भटजी, मंडपवाले, आचारी, व-हाडी मंडळी या सर्वावर गुन्हा नोंदविण्यात येईल. या बाबतची दंवडी सर्व गावात, सर्व ग्रामपंचायतीनी द्यावी तसेच दंवडी बाबतचा अहवाल गटविकास अधिकारी कार्यालयात सादर करावा.

संरपंच, पोलीस पाटील व ग्रामसेवक यांना '' अक्षय तृतीया'' या दिवशी आपआपल्या गावी उपस्थित रहावे, बाल विवाह होत असल्याचे लक्षात आल्यास त्याबाबत चाईल्ड हेल्प लाईन क्रं. १०९८ या टोल फ्री क्रमांकावर माहिती देण्यात यावी यासह संबंधित पोलीस स्टेशनला माहिती देण्यात यावी. अक्षय तृतीया'' या दिवशी जिल्ह्यात बाल विवाह होणार नाही याची दक्षता घ्यावी. असे जिल्हाधिकारी दीपा मुधोळ मुंडे यांच्या आदेशाने जिल्हा महिला व बालविकास अधिकारी यांनी कळविले आहे. अधिक माहितीसाठी जिल्हा महिला व बाल विकास अधिकारी कार्यालय धानोरा रोड, वरद प्राईड कॉम्प्लेक्स ता.जि.बीड या ठिकाणी संपर्क करण्यात यावा.

पान ६ वरून...

### पंकजाताई मुंडे यांना महात्मा

महात्मा फुले युवा दलाचे मार्गदर्शक आणि भाजप नेते अतुल सावे व संस्थापक अध्यक्ष एड.सतीश शिंदे यांच्या आदेशावरून महात्मा फुले युवा दलाचे बीड जिल्हाध्यक्ष अजय शिंदे व त्यांच्या सर्व सहकाऱ्यांनी भाजपा महायुतीच्या बीड लोकसभा उमेदवार माजी मंत्री पंकजाताई मुंडे यांना जाहीर पाठिंबाचे पत्र दिले. हे पत्र दिल्याने पंकजाताईंची जिल्ह्यात ताकद वाढली असून माळी समाज पूर्ण ताकतीने पंकजाताई मुंडे यांच्या पाठीशी उभा राहील अशी ग्वाही अजय शिंदे यांनी यावेळी दिली. यावेळी पंकजाताई मुंडे यांनी महात्मा फुले युवा दलाचे आभार मानून माळी समाजाच्या प्रश्नासाठी आपण कायम प्रयत्न करू अशी ग्वाही त्यांनी यावेळी दिली.

संपुर्ण माळी समाज आपल्या पाठीशी खंबीरपणे उभा राहील असा विश्वास पंकजाताई मुंडे यांनी व्यक्त केला .यावेळी महात्मा फुले युवा दलाचे जिल्हाध्यक्ष अजय मुंडे यांचे सर्व सहकारी ,भाजपाचे पदाधिकारी मोठ्या संख्येने उपस्थित होते .महात्मा फुले युवा दलाने पाठिंबा दिल्याने पंकजाताई मुंडे यांनी भाजप नेते अतुल सावे महात्मा फुले युवा दलाचे संस्थापक अध्यक्ष एड.सतीश शिंदे यांचेही आभार मानले. माळी समाज पंकजाताई यांच्या पाठीशी उभा राहिला तर पंकजाताई यांचा विजय निश्चित असल्याची चर्चा यावेळी झाली.

### कन्हैया कुमार यांचा उत्तर

मिळाला होता.

इंडिया आघाडीच्या जागावाटपात दिल्लीतील ७ लोकसभा जागांपैकी ४ जागांवर आम आदमी पक्ष तर ३ जागांवर काँग्रेस निवडणूक लढवत आहे. यापैकी उत्तर पूर्व दिल्ली लोकसभा जागा इंडिया आघाडीत काँग्रेसच्या वाट्याला आली. काँग्रेसने या जागेसाठी कन्हैय्या कुमारांना मैदानात उतरवायचे ठरवले. पक्षाच्या या निर्णयामुळे दिल्ली काँग्रेसमध्ये नाराजी पाहायला मिळाली होती. तसेच दिल्ली काँग्रेस माजी प्रदेशाध्यक्ष अरविंदर सिंह लवली यांनी राजीनामा देऊन भाजपमध्ये प्रवेश केला.

उत्तर पूर्व दिल्ली लोकसभा मतदारसंघातून भाजपने विद्यमान खासदार मनोज तिवारी यांना पुन्हा उमेदवारी दिली आहे. त्यामुळे या मतदारसंघात मनोज तिवारी विरुद्ध कन्हैय्या कुमार असा सामना रंगणार आहे. २०१९ च्या लोकसभा निवडणूकीत या मतदारसंघातून मनोज तिवारी यांना ५३.९० टक्के मते मिळाली होती. तर कन्हैय्या कुमार यांनी २०१९ ची लोकसभा निवडणूक बिहारच्या बिगुसराय मतदारसंघातून लढवली होती. तेव्हा भाजपचे गिरीराज सिंह यांनी कन्हैय्याचा पराभव केला होता. दिल्लीत ७ लोकसभा जागांसाठी मतदान होणार आहे.

### पंकजाताईंना माजलगाव

आघाडी देणार असल्याचे सांगून भाजप कार्यकर्त्यांनी कोणत्याही अपप्रचाराचा बळी न पडता बीड मधुन भाजप उमेदवार निवडून जाण्यासाठी प्रामाणिक प्रयत्न करावेत असे सांगितले या प्रसंगी तालुक्यातील बूथ प्रमूख, शक्ती केंद्र प्रमूख, विविध गावच्या सरपंचासह संतोषराव यादव,विस्तारक रमेश शेंडगे,सुशांत जाधवर, शरद यादव, बबनराव सिरसट, संजीवनीताई राऊत, विनायक रत्नपारखी, नानासाहेब घोडके,राम जगताप, दत्ता महाजन, पवन मोगरेकर, फेरोज इनामदार,वसंत अलकुंटे, बाळासाहेब शिरसागर,दिपक मुंडे, राज अर्जुन, दिपक जाधव यांची उपस्थिती होती.

पान ६ वरून...

### नरेंद्र मोदींना सत्तेतून

दल बदलून नेत्यांच्या सुद्धा समाचार घेतला व मताचे महत्त्व सांगून महाविकास आघाडीचे उमेदवार बजरंग सोनवणे यांचे मशीन क्रमांक एक वर असलेले दोन नंबर वरील तुतारी वाजविणारा माणूस या समोरील बटन दाबून मत करण्याची आवाहन केले सोबतच त्यांनी मतदानाच्या दिवशी जास्तीत जास्त संख्येने मतदान करून भाजपाला सत्तेतून हटविण्याचे आवाहन केले आहे शिवसेनेचे शहर प्रमुख व बैठकीचे आयोजक शेख निजाम यांनी कुणाचेही भूलथापांना बडी न पडता आपले मतदान करण्याची सूचना करून महाविकास आघाडीचे उमेदवार यांचे मशीन वरील चिन्ह व क्रमांक दाखवून मतदान करण्याची विनंती केली यावेळी मार्गदर्शन करताना माजी मंत्री सुरेश नवले यांनी केंद्र शासनाची नियतीवर हल्ला बोलून सर्व समाजाला सोबत घेऊन सत्ता परिवर्तन करण्याची आवाहन केले आहे .आपले मार्गदर्शन करताना प्राध्यापक सुशीला मोराळे यांनी केंद्र व राज्य शासनाची नियतीवर हल्ला चढविला तर बीड जिल्ह्याचे भाजपाचे उमेदवार पंकजा गोपीनाथ मुंडे यांच्या सुद्धा त्यांनी समाचार घेतला यावेळी त्यांनी सांगितले की मुंडे साहेबांचे नाव घेऊन मत मागण्याचे अधिकार भाजप आणि पंकजा मुंडे यांना नाही कारण की भाजप व पंकजा मुंडे यांचे राजकारण मोदी यांचे नावावर जिवंत आहे आणि मोदी यांची नीती देशासाठी घातक असून यांना केंद्र शासनाचे सत्तेतून तडीपार करणे गरजेचे आहे म्हणून सर्वांनी मिळवून महाविकास आघाडीचे उमेदवार बजरंग सोनवणे यांना बहुमताने विजय करण्याचे गरज असून त्यांनी महिला वर्गांना आकर्षित करून सांगितले की आपण घरी जाऊन आपले नातेवाईक मित्र यांना फोन द्वारे सूचना करण्याची विनंती करून १३ मे रोजी महाविकास आघाडीचे उमेदवार बजरंग सोनवणे यांचे निवडणूक चिन्ह तुतारी वाजविणारा माणूस जे मशीन क्रमांक १ वर २ नंबर वर आहे त्या बटन दाबून बहुमताने विजयी करून देण्याचे आवाहन केले यावेळी त्यांनी महिला वर्गांना आकर्षित करून सांगितले की जर महिला वर्गाने ठरविले तर जिल्ह्यातच नव्हे तर देशात सत्ता परिवर्तन झाल्या शिवाय राहणार नाही.

मोहम्मदीया कॉलणी मोमीनपुरा या भागातील नागरिकांनीच संयुक्त बैठक स्वयंस्फूर्तीने घेऊन बैठकीचे रुपांतर सभेत झाले शहर शिवसेना उद्धव बाळासाहेब ठाकरे पक्षाचे शफीक कुरेशी,मोमीन जुबैर,शाहेद कुरेशी,नगरसेवक शेख अमर, हाफिज अशफाक, शेख खदिर,सय्यद फहीम,मोमीन मोसिन, हाजी बबलूसेठ यांनी अंतक परिश्रम घेतले

### राष्ट्रवादी नगरसेवकाची

लागले. दरम्यान बजरंग सोनवणे यांच्या निवडणूक प्रचारासाठी काल आष्टीत शरदचंद्र पवार यांची जाहीर सभा पूर्व नियोजित होती. मात्र एक दिवस अगोदर उमेदवाराच्या गावात त्यातही कार्यकर्त्यांनी केलेल्या उद्योग समोर आला. कदाचित स्वतःच पवार साहेबांनी अंतरमुख होऊन सभा रद्द केली जात असावी असे तर्क वितर्क काढले जात आहेत. प्रदेश अध्यक्ष जयंत पाटील यांच्यावर रद्द झालेली सभा घेण्याची वेळ आली खरी पण, पवार साहेबांच्या सभा रद्द होण्यामागचे प्रमुख कारण चंदन तस्करीच असल्याचे बोलले जाते.

### दिवंगत गोपीनाथराव मुंडे


शिवसेना उपजिल्हाप्रमुख तथा छत्रपती शिवाजी महाराज कृषी उत्पन्न बाजार समितीचे संचालक गणेश बाप्पा उगले यांनी केले आहे. बीड विधानसभा व गेवराई विधानसभा कार्यक्षेत्रातील अनेक गावांच्या शिवसेना पदाधिकारी व कार्यकर्त्यांच्या बैठकीमध्ये गणेश उगले यांनी म्हटले आहे की महाराष्ट्राचे मुख्यमंत्री नामदार एकनाथरावजी शिंदे साहेब यांनी मराठा समाजाला दिलेले दहा टक्के आरक्षण हे कायद्याच्या प्रत्येक चौकटीत बसून दिले असल्यामुळे ते सर्वोच्च न्यायालयात टिकणारे आहे. तसेच ज्या ज्या वेळेस मराठा योद्धा मनोज जरांगे पाटील साहेब यांनी मराठा समाजाच्या हिताच्या मागण्या उपोषण आणि मोर्चा मधून त्या बहुतांश मागण्या महायुती सरकारचे मुख्यमंत्री एकनाथ रावजी शिंदे साहेब यांनी पूर्ण केलेले आहेत. मराठा समाजाच्या विद्यार्थ्यांना सारथीसह शिक्षणामधील वेगवेगळ्या शिष्यवृत्ती महाराष्ट्र सरकारने सुरू करून त्याचा लाभ दिला आहे. स्वतःला जाणते राजे समजणारे शरदचंद्रजी पवार साहेब यांनी मराठा समाजावर सत्ता असताना आणि सत्ता नसताना काय मान्य केला आहे. १९९४ मध्ये मराठा समाजाच्या कुणबीच्या नोंदी प्रशासनाला हाताशी धरून दाबण्याचे व मराठा समाजाला आरक्षण न देण्याचे पाप सुद्धा शरद पवार साहेब यांच्या सरकारने केले आहे. त्यामुळे जिल्ह्यातील मराठा समाजाने भावनेच्या भरात न जाता जिल्ह्यामध्ये विविध विकासाचे प्रकल्प आणण्यासाठी डोळस आणि प्रगल्भवृत्तीने पंकजाताई मुंडे यांना मतदान करावे. महाविकास आघाडीचे उमेदवार बजरंग बप्पा सोनवणे यांना मराठा समाजाचे कसलेही देणे घेणे आणि सोयर सुतक नाही. फक्त समाजाच्या लाटेवर स्वार होण्याचा त्यांचा प्रयत्न आहे पण हा प्रयत्न जिल्ह्यातील तमाम मराठा समाजाचे मतदार हाणून पाडणार असून जिल्ह्यातील सुजान जनता विकास ही जात आणि विकास आज धर्म हे ब्रीद वाक्य समोर ठेवून नामदार पंकजाताई मुंडे यांना दिल्लीत पाठवील व देशामध्ये देशाचे कणखर पंतप्रधान नरेंद्र मोदी साहेब यांचे हात बळकट करण्यासाठी बीड जिल्हा सिंहाचा वाटा उचलेल असा विश्वासही शिवसेना उपजिल्हाप्रमुख तथा छत्रपती शिवाजी महाराज कृषी उत्पन्न बाजार समितीचे संचालक गणेश बप्पा उगले यांनी व्यक्त केला आहे.

# सोयाबीन उत्पादक शेतकऱ्यांना हेक्टरी ५ हजार रुपये मिळणार

## १२ जून पर्यंत पैसे जमा, कृषिमंत्री धनंजय मुंडे यांची माहिती

अहमदपूर : मागील संपूर्ण वर्ष सोयाबीन उत्पादक शेतकऱ्यांसाठी निराशेचे राहिले आहे. अर्थात गेल्या काही महिन्यांपासून तर सोयाबीन उत्पादक शेतकऱ्यांना हमीभावापेक्षा कमी दर मिळत आहे. ज्यामुळे सध्या ऐन लोकसभा निवडणुकीच्या काळात सोयाबीन दराचा मुद्दा ऐरणीवर आला असून, सत्ताधारी भाजपची यामुळे चांगलीच गोची झाली आहे. अशातच आता राज्याचे कृषिमंत्री धनंजय मुंडे यांनी राज्यातील सोयाबीन उत्पादक शेतकऱ्यांना प्रति हेक्टरी ५ हजार रुपये आर्थिक मदत देण्याची घोषणा केली आहे. ते भाजप उमेदवार सुधाकर शृंगारे यांच्या प्रचारासाठी लातूर जिल्ह्यातील अहमदपूर येथे आले होते. यावेळी त्यांनी ही घोषणा केली आहे.

सोयाबीन उत्पादक शेतकऱ्यांसाठी हेक्टरी ५ हजार रुपये मिळणार घोषणा करतानाच, येत्या १२ जूनपर्यंत राज्यातील शेतकऱ्यांच्या खात्यावर हे पैसे जमा केले जाणार आहेत, अशी माहितीही धनंजय मुंडे यांनी यावेळी दिली आहे. प्रामुख्याने खरीपातील सोयाबीन आणि कापूस उत्पादक शेतकऱ्यांना साडे चार हजार कोटी रुपयांचे पॅकेज




राज्य सरकारने जाहीर केले आहे. या पॅकेजच्या माध्यमातून सोयाबिन उत्पादक शेतकऱ्यांसाठी हेक्टरी ५ हजार रुपये देण्यात येणार असल्याचे धनंजय मुंडेंनी यावेळी सांगितले आहे. दरम्यान, भर प्रचारसभेत आचारसंहिता काळात राज्याच्या कृषिमंत्र्यांनी ही मोठी आर्थिक घोषणा केल्याने,

### कापूस उत्पादकांनाही मिळणार मदत

इतकेच नाही तर राज्यातील शेतकऱ्यांना कापूस पिकासाठीची आर्थिक मदत देण्याबाबत अजून स्पष्टता नाही. कापूस पिकाची मदत क्विंटलवर द्यायची की हेक्टरवर द्यायची हे अजून निश्चित झालेले नाही. त्यामुळे, तेही लवकरच ठरवले जाऊन कापूस उत्पादक शेतकऱ्यांनाही लाभ मिळवून देण्यात येणार आहे. कापूस उत्पादकांना दिली जाणारी ही आर्थिक मदत देखील १२ जूनपर्यंत शेतकऱ्यांच्या खात्यावर जमा केली जाणार आहे, अशी माहितीही धनंजय मुंडे यांनी यावेळी दिली.

विरोधी पक्षातील नेते काय भूमिका घेतात? हे पाहणे महत्वाचे ठरणार आहे. कारण मदतीच्या घोषणेनंतर, आर्थिक मदतीच्या वितरणाची तारीखही जाहीर केली आहे. निवडणूक काळात आचारसंहिता असल्याने कुठलीही मोठी घोषणा करता येत नाही, किंवा मतदारांना आमिष दाखवून मत वळवण्याचा प्रयत्न करण्यात येत नाही. त्यामुळे विरोधी पक्षांना हे आयतेच कोलीत सापडणार आहे.

# महाराष्ट्रात ३० हजार गार्यींमध्ये 'मसल प्रिंट' तंत्रज्ञानाचा वापर



जनावरांची ओळख पटवण्यासाठी आणि त्यांच्या माहितीचा मागोवा ठेवण्यासाठी महाराष्ट्र पशुधन विकास मंडळ आधुनिक 'मसल प्रिंट' तंत्रज्ञानाचा वापर करणार आहे. या तंत्रज्ञानाचा प्रायोगिक वापर राज्यातील ३० हजार गार्यींवर केला जाणार असल्याची माहिती मंडळाचे मुख्य कार्यकारी अधिकारी डॉ. सतीश राजू यांनी दिली.

सध्या जनावरांची ओळख पटवण्यासाठी कानात टॅग लावले जातात. मात्र, हे टॅग कधीकधी हरवू शकतात किंवा खराब होऊ शकतात. यामुळे जनावरांची माहिती मिळवणे कठीण होते. 'मसल प्रिंट' तंत्रज्ञान या समस्येवर उपाययोजना करते. या तंत्रज्ञानाद्वारे, जनावराच्या नाकाजवळील काळ्या भागाचा स्कॅन घेऊन त्यावर माहिती नोंदविली जाते. ही माहिती विशिष्ट स्कॅनरद्वारे वाचली जाऊ शकते. जनावराची जात, वय, लिंग, आरोग्य इतिहास आणि इतर माहिती 'मसल प्रिंट' मध्ये समाविष्ट असू शकते.

"हे तंत्रज्ञान जनावरांची चोरी आणि तस्करी रोखण्यास मदत करेल. तसेच, पशुधन विकास कार्यक्रमांचे प्रभावी अंमलबजावणीसाठीही ते उपयुक्त ठरेल." 'मसल प्रिंट' तंत्रज्ञानाचा वापर करणारे महाराष्ट्र हे पहिले राज्य बनणार आहे. या तंत्रज्ञानासाठी केंद्र सरकारने ईव्हर्स कंपनीसोबत करार केला आहे.

या तंत्रज्ञानाचे फायदे : जनावरांची अचूक आणि सहज ओळख. कानातील टॅग गमावल्यासही माहिती उपलब्ध. जनावरांची चोरी आणि तस्करी रोखण्यास मदत. पशुधन विकास कार्यक्रमांचे प्रभावी अंमलबजावणी.

जनावरांच्या आरोग्य व्यवस्थापनात सुधारणा. 'मसल प्रिंट' तंत्रज्ञान हे पशुधन व्यवस्थापनात क्रांती घडवून आणण्याची क्षमता असलेले एक आधुनिक तंत्रज्ञान आहे. महाराष्ट्रात या तंत्रज्ञानाचा वापर केल्याने जनावरांची माहिती व्यवस्थापन सुधारण्यास आणि पशुधन क्षेत्रात अनेक फायदे मिळण्यास मदत होईल.

# विक्रमी उत्पादनासाठी योग्य टोमॅटो वाणांची लागवड करा

यंदाचा पावसाळा महिनाभरावर येऊन ठेपला आहे. त्यातच हवामान विभागाने यंदा सरासरीच्या तुलनेत अधिक पाऊस पडणार असल्याचे आपल्या अंदाजात म्हटले आहे. त्यामुळे सध्या राज्यातील बऱ्याच भागांमध्ये शेतकऱ्यांची पीक नियोजनाची लगबग सुरु झाली आहे. अनेक जण सध्या कोणते टोमॅटो वाण निवडावे? याबाबत चर्चा करताना दिसून येत आहेत. पावसाळी हंगामात लावता येणाऱ्या काही प्रमुख जातींची माहिती असणे आवश्यक आहे.

शेतकऱ्यांनी प्रामुख्याने आपल्या टोमॅटोची लागवड करताना काही गोष्टी विचारात घेणे आवश्यक आहे. यात प्रामुख्याने पावसाळी हंगामातील टोमॅटो लागवडीसाठी तुमच्या जमिनीच्या मगदूराप्रमाणे, स्थानिक हवामानानुसार योग्य जातींची निवड करणे आवश्यक राहणार आहे. त्यासाठी तुम्ही स्थानिक कृषी सेवा केंद्र चालकाचा किंवा कृषी तज्ज्ञांचा सल्ला घेऊ शकतात. किंवा मग योग्य त्या शिफारस करण्यात आलेल्या वाणांची निवड करू शकतात.

पुसा रुबी : पुसा रूबी हा टोमॅटोचा एक सुधारित वाण असून याची पावसाळी हंगामात लागवड करता येणे शक्य आहे. कृषी तज्ज्ञांनी सांगितल्याप्रमाणे या जातीची तिन्ही हंगामात लागवड करता येणे शक्य आहे. या जातीचे पीक तीन महिन्यात हार्वेस्टिंगसाठी तयार होते. या जातीपासून हेक्टरी ३२५ क्विंटल पर्यंतचे उत्पादन मिळत असल्याचा दावा केला जातो. गौरव : हा देखील टोमॅटोचा एक सुधारित प्रकार आहे. या जातीची देशातील अनेक प्रमुख टोमॅटो उत्पादक भागांमध्ये लागवड पाहायला मिळते. या जातीपासून शेतकऱ्यांना हेक्टरी ४०० क्विंटल पर्यंतचे दर्जेदार उत्पादन मिळत असल्याचा दावा केला जातोय.

पुसा शितल : पुसा शितल या जातीची देखील देशातील अनेक राज्यांमध्ये लागवड केली जाते. या जातीपासून हेक्टरी ३५० क्विंटलपर्यंतचे उत्पादन मिळत असल्याचा दावा केला जातोय.

अर्का गौरव : या जातीचे टोमॅटो गडद लाल रंगाचे असतात. या जातीपासून शेतकऱ्यांना चांगले विक्रमी उत्पादन मिळत आहे. कृषी तज्ज्ञांनी सांगितल्याप्रमाणे या जातीपासून शेतकऱ्यांना हेक्टरी. ३५० क्विंटल पर्यंतचे उत्पादन मिळू शकते.



# दिन विशेष

### महत्वाच्या घटना

१८४९ : जॉन इलियट ड्रिंकवॉटर बेथुन यांनी कलकत्ता फिमेल स्कूल सुरू केले.
१८७८ : पुण्यात पहिले मराठी ग्रंथकारांचे संमेलन म्हणजे आताचे साहित्य संमेलन भरविण्यात आले.
१९०७ : मुंबईमध्ये विजेच्या शक्तीवर चालणारी पहिली ट्रॅम सुरु झाली.
१९२८ : ब्रिटन देशातील मतदाराची वयोमर्यादा ही ३० वर्षावरून कमी करून २१ वर्ष करण्यात आली.
१९४० : विन्सटन चर्चिलन यांची ब्रिटनच्या पंतप्रधान पदी नियुक्ती करण्यात आली.
१९४६ : सोनी ह्या कंपनी ची स्थापना झाली.
१९५५ : एअर इंडिया ची मुंबई टोकियो विमानसेवा सुरू झाली.
१९७६ : होंडा एकॉर्डा या गाडी प्रकाशित करण्यात आली.
१९९० : लता मंगेशकर यांना दादासाहेब फाळके पुरस्कार प्रदान.
१९९२ : एन्डेव्हर हे अंतराळयान आपल्या पहिल्या मोहिमेवर निघाले.
१९९८ : मर्सिडीज-बेंज कंपनी ने क्रिस्लर हि कंपनी ४० अब्ज अमेरिकन डॉलर्स मध्ये विकत घेतली ही इतिहासातील सर्वात मोठी औद्योगिक विलीनीकरण आहे.
२००० : व्लादिमीर पुतिन रशियाचे राष्ट्राध्यक्ष बनले.
२००४ : नेपालचे तत्कालीन पंतप्रधान सूर्य बहादूर थापा यांनी आपल्या पदाचा राजीनामा दिला.
२००० : कोची येथे झलेल्या आंतरराष्ट्रीय बुद्धिबळ स्पर्धेत तिरुअनंतपुरमचा नऊ वर्षाचा बुद्धिबळपटू अर्जुन विष्णुवर्धन याला भारतातील सर्वात लहान फिडे मास्टर होण्याचा मान मिळाला.
२०१२ : रशियाचे माजी राष्ट्राध्यक्ष व्लादिमिर पुतीन यांनी तिसऱ्यांदा रशियाच्या राष्ट्राध्यक्ष पदाची शपथ घेतली.

### जन्मदिवस । जयंती । वाढदिवस

१७९२ : युगोस्लाव्हिया सोशलिस्ट फेडरल रिपब्लिकचे माजी अध्यक्ष व क्रांतिकारक जोसेफ टिटो यांचा जन्मदिन.
१८६१ : पहिले भारतीय नोबेल पुरस्कार विजेते रबिंद्रनाथ ठाकूर तथा टागोर यांचा कलकत्ता येथे पिराली ब्राम्हण कुटुंबात जन्म. (मृत्यू: ७ ऑगस्ट १९४१)
१८८० : भारतरत्न पांडुरंग वामन काणे यांचा जन्म. (मृत्यू: १८ एप्रिल १९७२)
१८९२ : क्रांतिकारक आणि युगोस्लाव्हियाचे पहिले राष्ट्राध्यक्ष जोसेफ टिटो यांचा जन्म. (मृत्यू: ४ मे १९८०)
१९०९ : पोलरॉइड कॉर्पोरेशनचे संस्थापक एडविन एच. भूमी यांचा जन्म. (मृत्यू: १ मार्च १९९१)
१९१२ : ज्ञानपीठ पारितोषिक विजेते गुजराथी कथा-कादंबरीकार पन्नालाल पटेल यांचा जन्म. (मृत्यू: ६ एप्रिल १९८९ अहमदाबाद, गुजरात)
१९२३ : आत्माराम भेंडे, मराठी अभिनेता, दिग्दर्शक, लेखक.
१९४८ : मैहर घराण्याचे बासरी वादक नित्यानंद हळदीपूर यांचा जन्म.
१९६९ : उत्तरप्रदेश राज्याचे उपमुख्यमंत्री व भारतीय जनता पक्षाचे सदस्य केशव प्रसाद मौर्य यांचा जन्मदिन.

### मृत्यू । पुण्यतिथी । स्मृतिदिन

१९२४ : भारतीय कार्यकर्ते अलायरी सीताराम राजू यांचे निधन.
१९९१ : लोककवी मनमोहन उर्फ गोपाल नरहर नातू यांचे पुणे येथे निधन. (जन्म: ११ नोव्हेंबर १९११)
१९९४ : ध्रुपद गायक उस्ताद नसीर झहिरुद्दिन डागर यांचे निधन.
१९९९ : भारतीय महाराष्ट्रीयन मराठी कवी मनमोहन उर्फ गोपाल नरहर नातू यांचे निधन.
२००१ : लेखिका मालती बेडेकर ऊर्फ विभावरी शिरुरकर यांचे निधन. (जन्म: १८ मार्च १९०५)
२००१ : गीतकार, पद्मश्री पुरस्काराने सन्मानित प्रेम धवन यांचे निधन. (जन्म: १३ जून १९२३ अंबाला, पंजाब)
२००२ : दुर्गाबाई भागवत, मराठी लेखिका, लोक संस्कृती तसेच लोकसाहित्याच्या संशोधक, लेखन विचार स्वातंत्र्याच्या पुरस्कर्त्या.

# ऱ्होड आयलँड रेड जातीच्या कोंबड्या देतात दुप्पट नफा

शेतकरी अधिक नफा मिळविण्यासाठी शेतीसोबतच इतर व्यवसाय करत असतात. जेणेकरून त्यांना शेतीतून दुहेरी आर्थिक उत्पन्न मिळवण्याची अपेक्षा असते. आजकाल ग्रामीण भागात शेतकरी कुक्कुटपालन व्यवसायाचा अवलंब करत आहेत. विशेष म्हणजे चांगल्या जातीच्या कोंबड्यांचे संगोपन करून, शेतकरी वर्षानुवर्षे चांगले पैसे कमवू शकतात. त्यामुळे आता 'ऱ्होड आयलँड रेड' कोंबडी एक चांगला पर्याय ठरू शकते. ज्यातून दुप्पट नफा मिळू शकतो.

अनेक शेतकऱ्यांना पोल्ट्री व्यवसायामध्ये उतरून अधिकचा नफा मिळवण्याची अपेक्षा असते. मात्र, त्यासाठीचे भांडवल, सर्व खर्च, उत्पन्न आणि चांगल्या जातीची कोंबड्यांची माहिती नसल्याने त्यांना त्यातून नफा मिळत नाही. जर तुम्हालाही चांगल्या जातीच्या कोंबड्यांचे संगोपन करून फायदा मिळवायचा असेल. तर तुम्ही नक्कीच 'ऱ्होड आयलँड रेड' जातीच्या कोंबड्या पाळू शकता.

'ऱ्होड आयलँड रेड' ही कोंबडी ऑस्ट्रेलियन जातीची आहे. ज्याची अंडी उत्पादन क्षमता प्रति वर्ष २९० ते ३०० अंडी आहे. याउलट देशी जातीची कोंबडी वर्षाला १०० ते १५० अंडी देते. आरआयआर ही अंडी उत्पादनासाठी सर्वोत्तम जात मानली जाते. या जातीची कोंबडीची पिल्ले अंडी घालण्यासाठी फार लवकर विकसित होतात. या जातीची कोंबडी तुम्ही घराच्या मागेही सहज पाळू शकतात. या जातीच्या कोंबडीची रोगप्रतिकारक शक्ती देखील चांगली असते. ज्यामध्ये आजारी पडण्याची शक्यता खूपच कमी असते. बाजारपेठेत सर्वाधिक मागणी : ऱ्होड आयलँड रेड कोंबडी एका वर्षात सुमारे ३०० अंडी देते. ज्याची किंमत भारतीय बाजारपेठेत खूप जास्त आहे. तसे पाहिले तर या जातीच्या कोंबडीचे अंडी १० ते १२ रुपयांना प्रति नग विकले जाते. दुसरीकडे, इतर जातींच्या कोंबडीच्या अंड्याची किंमत सात ते आठ रुपयांपर्यंत आहे. त्याच वेळी त्याच्या मांसाची किंमत देखील बाजारात सर्वाधिक आहे. अशा परिस्थितीत आरआयआर जातीच्या कोंबडीचे पालन करून चांगला नफा मिळवू शकतात.

# सफेद नाचणी लागवड तंत्रज्ञान

हा एक दुर्मिळ प्रकार आहे, जो त्याच्या पौष्टिक मूल्य आणि कमी ग्लायसेमिक इंडेक्ससाठी ओळखला जातो. हे पीक तांदूळ आणि गव्हापेक्षा जास्त प्रमाणात प्रथिने, खनिजं आणि जीवनसत्त्वे प्रदान करते. सफेद नाचणीची लागवड पारंपारिक रागीसारखीच आहे, तरीही काही विशिष्ट गोष्टी लक्षात ठेवणे आवश्यक आहे.

हवामान आणि जमीन : सफेद नाचणी उष्ण आणि कोरड्या हवामानात चांगली वाढते. हे पीक २० ते ३० अंश सेल्सियस तापमानात चांगले वाढते. सफेद नाचणीला हलकी ते मध्यम काळी, पाण्याचा निचरा होणारी जमीन आवश्यक आहे. जमिनीचा पीएच ६ ते ८ च्या दरम्यान असणे आवश्यक आहे.

पेरणी : सफेद नाचणीची पेरणी जून ते जुलै महिन्यात केली जाते. पेरणीपूर्वी, बिया २४ तास पाण्यात भिजवून ठेवा. बिया १० ते १५ सेंटीमीटर अंतरावर आणि २ ते ३ सेंटीमीटर खोलीवर पेरणे आवश्यक आहे.

खत आणि पाणी : सफेद नाचणीला नत्र, स्फुरद आणि पालाश खताची आवश्यकता असते. खत दोन टप्प्यात द्यावे, एक पेरणीनंतर आणि



दुसरे रोप उगवून आल्यावर. सफेद नाचणीला कमी पाण्याची आवश्यकता असते. पाऊस नसल्यास, १० ते १५ दिवसांच्या अंतराने पाणी द्या.

तण नियंत्रण : तण नियंत्रण हे सफेद नाचणीच्या लागवडीमध्ये महत्त्वाचे आहे. पेरणीनंतर १५ दिवसांनी पहिली खुरपणी करा आणि त्यानंतर आवश्यकतानुसार खुरपणी करा.

रोग आणि किड : सफेद नाचणीला बुरशीजन्य रोग आणि कीड लागण्याची शक्यता असते. रोग आणि किडींच्या नियंत्रणासाठी जैविक आणि रासायनिक पद्धतींचा वापर करा.

काढणी : सफेद नाचणी पेरणीनंतर ९० ते १०० दिवसांत तयार होते. धान्य पिकल्यावर काढणी करा. धान्य काढून घेतल्यानंतर, ते योग्यरित्या वाळवा आणि साठवा.

सफेद नाचणीचे फायदे : सफेद नाचणीमध्ये प्रथिने, खनिजं आणि जीवनसत्त्वे जास्त प्रमाणात असतात.सफेद नाचणीचा ग्लायसेमिक इंडेक्स कमी आहे, मधुमेह रुग्णांसाठी फायदेशीर आहे. सफेद नाचणी पचायला हलकी आहे. सफेद नाचणी रोगप्रतिकारशक्ती वाढवण्यास मदत करते.

निष्कर्ष : सफेद नाचणी हे एक पौष्टिक आणि फायदेशीर पीक आहे. योग्य व्यवस्थापन आणि काळजी घेतल्यास, तुम्ही यशस्वीरित्या सफेद नाचणीची लागवड करू शकता आणि त्याचे अनेक फायदे मिळवू शकता. वरील माहिती सामान्य मार्गदर्शनासाठी आहे. आपल्या विशिष्ट परिस्थितीनुसार योग्य तंत्रज्ञान आणि पद्धतींचा वापर करा. कृषी तज्ञाचा सल्ला घेणे नेहमीच फायदेशीर ठरते.

# जिल्हा रुग्णालयात एमआरआय मशिन तर स्वरातीचे सिटी स्कॅन ४ महिन्यांपासून बंद

## रूग्णांची हेळसांड; शासनकर्ते उदासीन: डॉ.गणेश ढवळे

बीड । प्रतिनिधी

सध्या लोकसभा निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर प्रचाराची रणधुमाळी असुन विकासाच्या पोकळ गप्पा मारणा-या लोकप्रतिनिधी आणि शासनकर्ते यांची सर्वसामान्य लोकांना आरोग्य सुविधा देण्याबाबत उदासिनता दिसून येत असुन जिल्ह्यातील सर्वांत मोठी आरोग्य संस्था असलेल्या जिल्हा रुग्णालयात अपघात,मेंदुत ताप गेलेले रूग्ण, शरीरातील नसांच्या वेदना आदि आजारांचे निदान करण्यासाठी आवश्यक असणारे एमआरआय मशिन सारखे उपकरण उपलब्ध नसल्याने निदान व उपचारास उशिर होत रूग्णांची हेळसांड होत असुन खाजगी केंद्रात जाऊन आर्थिक भुर्दंड सहन करावा लागत आहे तर अंबेजोगाई येथील स्वरातीतील सिटी स्कॅन मशिन वारंवार नादुरुस्त असल्याने ४ महिन्यांपासून बंद आहे त्यामुळे तातडीने जिल्हा नियोजन निधीमधून निधी उपलब्ध करून देण्यात यावा अशी मागणी सामाजिक कार्यकर्ते तथा बीड जिल्हा मुख्य प्रचार प्रमुख बीड जिल्हा माहिती आधिकार कार्यकर्ता महासंघ डॉ.गणेश ढवळे लिंबागणेशकर,शेख युनुस,सुदाम तांदळे,शिवशर्मा शेलार, मुस्ताक शेख यांनी जिल्हाधिकारी बीड यांच्या मार्फत मुख्यमंत्री, प्रधान सचिव, आरोग्य मंत्री, आरोग्य सचिव, पालकमंत्री बीड यांना केली आहे.




राज्य सरकारच्या आरोग्य विभागाने १५ आगस्ट २०२३ पासुन सर्व तपासण्या आणि उपचार मोफत करण्याचा निर्णय घेतला आहे.मात्र औषधी,उपकरणे आणि तज्ञ पुरवताना हात आखडता घेतला असुन यामुळे सामान्य रूग्णांची हेळसांड होत असुन बीड जिल्हा रुग्णालयात रोज आंतररुग्ण विभागात ५०० च्या वर रुग्ण असतात तर बाह्यरुग्ण विभागात तपासणीसाठी ७०० हुन अधिक रुग्ण येतात.दरम्यान अपघाती रुग्ण , मेंदुत ताप गेलेले रुग्ण, शरीरातील नसांच्या वेदना आदि आजारांचे निदान करण्यासाठी एमआरआय मशिनसारख्या उपकरणांची आवश्यकता असते.बीड जिल्हा रुग्णालयाला ७० वर्षे कालावधी उलटूनही जिल्ह्यातील सर्वात मोठी आरोग्य संस्था असलेल्या जिल्हा रुग्णालयात हे उपकरण नाही.या उपकरणासाठी सामाजिक कार्यकर्ते यांनी आंदोलने करूनही शासनकर्ते आणि धोरणकर्ते यांच्यात फरक पडला नाही. जिल्हा रुग्णालयात एमआरआय मशिन उपलब्ध नसल्याने जिल्हा रुग्णालयात आलेल्या रूग्णांची एमआरआय उपकरणाद्वारे तपासणी करायची असेल तर त्याला खाजगी केंद्रात तपासणीसाठी जावे लागते.आजारी रूग्णांची यामुळे फरपट होते.येण्याजाण्याच्या वेळेमुळे आजाराचे निदान व उपचार होण्यास उशीर होतो आणि तपासणी शुल्क भरावे लागत असल्याने आर्थिक भुर्दंड सहन करावा लागतो. त्यामुळे एमआरआय मशिनसाठी जिल्हा नियोजन निधीतून निधी उपलब्ध करून देण्यात यावा. ग्रामीण भागातील सर्वसामान्य रुग्णांचा आधार असलेल्या स्वामी रामानंद तीर्थ रूग्णालयातील सिटी स्कॅन मशिन दुरुस्तीचे प्रयत्न निष्फळ ठरले असुन गेल्या ४ महिन्यांपासून मशिन बंद अवस्थेत आहे.त्यामुळे रूग्णांना खाजगी सिटी स्कॅन केंद्राचा नाहक भुर्दंड सहन करावा लागत आहे.अंबेजोगाई येथील स्वाराती रूग्णालयातील सिटी स्कॅन मशिनला १२ वर्षाचा कालावधी पूर्ण झाला असल्याने त्याचे अपग्रेडेशन अथवा नविन यंत्राचे भाग बसवावे लागतात.मध्यंतरी जिल्हा नियोजन निधीतुन उपलब्ध झालेल्या ८० लाख रुपये निधीतुन अपग्रेडेशनसाठी संबंधित कंपनीच्या अभियंत्यांच्या पथकाने ३ दिवस काम करून यंत्र सुरू केले मात्र पुन्हा एक तसातच बंद पडले.दुसरा यंत्राचा भाग निकामी झाल्याचे अभियंत्याने स्वराती प्रशासनाला कळवले असुन रुग्णांची हेळसांड होऊ नये यासाठी नविन सिटी स्कॅन मशिनची आवश्यकता असुन त्यासाठी निधी उपलब्ध करून देण्यात यावा.

# धारूरच्या आठवडी बाजारात शुकशुकाट

## पालेभाज्या न विकल्यामुळे शेतकऱ्यांचे आर्थिक नुकसान



धारूर । प्रतिनिधी

धारूर शहरांमध्ये आठवडी बाजार उन्हाच्या तीव्रतेमुळे भाजीपाला खरेदी करण्यासाठी महिला व पुरुष घराबाहेर पडत नसल्याने आठवडी बाजारात शुकशुकाट दिसत आहे मे महिन्याच्या पहिल्या आठवड्यात सूर्य आग ओकत आहे धारूर शहरातील तापमान ४० डिग्री सेल्सिअस आहे त्यामुळे भाजीपाला विक्रीसाठी घेऊन आलेले शेतकरी भर उन्हात गिऱ्हाईकाची वाट पाहत बसतात परंतु वाढलेल्या उन्हाच्या तीव्रतेमुळे शहरातील नागरिक भाजीपाला खरेदीसाठी बाजारात येत नाही त्यामुळे बाजारात फक्त भाजीपाला विकणारे शेतकरी दिसतात. बाजारात भाजीपाला विक्रीसाठी ग्रामीण भागातून शेतकऱ्यांनी आणलेला भाजीपाला ग्राहकांना अभावी विक्री होत नसल्याने भाजीपाला परत घेऊन जाण्याची वेळ शेतकऱ्यांवर येत आहे.शेतकऱ्यांनी विक्रीसाठी आणलेल्या पालक मेथी कोथिंबीर टोमॅटो आदी पालेभाज्या विक्री होत नसल्याने त्या खराब होतात त्यामुळे शेतकऱ्यांचे आर्थिक नुकसान असल्याचे बाजारात विक्रीसाठी भाजीपाला घेऊन येणारे शेतकरी सांगत आहेत.

# माजलगावात व्यापाऱ्यांच्या वतिने मतदान जनजागृती अभियान




माजलगाव । प्रतिनिधी

माजलगाव येथील चप्पल बुटाचे पटेल शु.कं. या भव्य शोरुम च्या वतिने १३ मे रोजी होऊ घातलेल्या लोकसभा निवडणुकीच्या मतदानाच्या अनुषंगाने लोकशाही बळकट करण्यासाठी परिसरातील नागरिकांनी मतदान करावे यासाठी मतदान जनजागृती करण्याचे डिजीटल फलक आपल्या शो रुम मध्ये तसेच शो रुमच्या बाहेरील परिसरात लावुन जनजागृती करण्यात येत आहे.

मतदान हे आपले कर्तव्य आहे आपण केलेल्या मतदानातुन आपल्या देशाचे भविष्य लिहिले जाणार आहे.मतदान न करता फिरायला जाणे,आपल्या एका मताने काय होणार आहे ? असे बोलणे व भविष्यात हेच लोक आपल्या देशात काही होऊ शकते असे नकारात्मक बोलुण आपल्याला जो लोकशाही बकळट करण्यासाठी दिलेल्या अधिकाराच्या बाबतीत उदासीनता दिसुन येते आहे.मतदानाची टक्केवारी दिवसन दिवस कमी होताना दिसत आहे. हिच गोष्ट लक्षात घेवुन पटेल शु.कं. च्या वतिने आपल्या दुकानात खरेदी करण्यासाठी येणार्या ग्राहकांना व इतर लोकांना मतदानासाठी प्रोत्साहीत करण्यासाठी डिजीटल फलक लावुन जागृती करण्यात येत आहे. पटेल शु.कं. चे संचालक इम्रान खान व अबुल हश्मी यांनी जगातील सर्वात मोठ्या लोकशाहीला बळकट करण्यासाठी मतदान करण्याचे अवहान केले आहे.

# अंजनडोह ग्रामपंचायत कार्यालयासमोर ग्रामस्थांचे आमरण उपोषण

## झोपेचं सोंग घेणारे अधिकारी,गुत्तेदार कधी जागे होणार

धारूर । प्रतिनिधी

धारूर तालुक्यातील अंजनडोह येथील जलजीवन मिशन योजनेअंतर्गत पाईपलाईनचे रखडलेले काम दिनांक ५ मे २०२४ पर्यंत सुरू करावे पाईपलाईनचे काम सुरू न झाल्यास दिनांक सहा मे पासून आमरण उपोषणाचा करणार असल्याचे निवेदन जिल्हा परिषद चे मुख्य कार्यकारी अधिकारी अधिकारी तसेच धारूर चे तहसीलदार यांना निवेदन दिले होते. निवेदनाची दखल न घेतल्यामुळे ग्रामस्थांनी दिनांक ६ मे २०२४ रोजी अंजनडोह येथील ग्रामपंचायत कार्यालयासमोर सामूहिक आमरण उपोषण सुरू केले आहे.

गावात तीव्र पाणीटंचाई झाल्याने नागरिकांचे हाल होत आहेत. पाणीपुरवठा योजनेचे २० टक्के काम राहिलेले असून सहा महिन्यापासून काम बंद ठेवल्याने नागरिकांची पाण्याची अडचण वाढली आहे.यासाठी निवेदन मागणी करूनही याकडे अधिकारी संबंधित गुत्तेदराने दुर्लक्ष




केल्यामुळे आमच्यावर अमरण उपोषण करण्याची वेळ आली आहे उपोषणादरम्यान गावकऱ्यांच्या जीविताला काही हानी पोहोचल्यास याला सर्वस्वी प्रशासन व गुत्तेदार जबाबदार असतील अशा संत्तप प्रतिक्र्या उपोषण कर्त्यांनी दिल्या आहेत. उपोषणाची दखल न घेतल्यास आंदोलन सुरू ठेवण्याचा निर्धार गावकऱ्यांनी केला आहे

जिल्हा परिषद मुख्य कार्यकारी अधिकारी यांनी दंडात्मक नोटीस काढून देखील काहीच फरक नाही. जिल्हा परिषदचे मुख्य कार्यकारी अधिकारी अधिकारी यांनी दिनांक ३० एप्रिल २०२४ रोजी नोटीस काढून संबंधित पाईपलाईनचे लिकेज काढणे व अर्धवट राहिलेले काम पूर्ण करून गावकऱ्यांना पाणीपुरवठा का केला नाही त्याचा खुलासा नोटीस मिळाल्यापासून दोन दिवसात करावा अशा सूचना शासकीय गुत्तेदार महादेव मोतीराम मातकर याला केल्या होत्या . दोन दिवसात खुलासा न केल्यास आपणास शासन नियमाप्रमाणे दररोज एक हजार रुपये दंड व आपले नाव काळया यादीत टाकले जाईल असे नोटीसीद्वारे कळवले होते. परंतु या नोटिसायला गुत्तेदार जुमानत नसल्याचे दिसून येते.

# इंद्रप्रस्थ कॉलनी येथे तिनदिवसीय हरिनाम सोहळ्याचे आयोजन

बीड । प्रतिनिधी

श्री संत वामन भाऊ महाराज व भगवान बाबा यांच्या कृपा आशीर्वादाने प्रतिवर्षाप्रमाणे याही वर्षी श्री संत भगवान बाबा संत तुकाराम महाराज विठ्ठल रुक्मिणी व हनुमान देवता मूर्ती प्राणप्रतिष्ठेच्या तपपूर्ती सोहळा व १२ व्या वर्धापन दिनानिमित्त ह. भ. प. गुरुवर्य विठ्ठल महाराज शास्त्री श्री क्षेत्र संस्थान गहिनीनाथ गड यांच्या आशीर्वादाने सर्वधर्म समभाव व राष्ट्रीय एकात्मता अखंड त्रिदिवशी हरिनाम सोहळा मिती वैशाख ३ शुक्रवार दिनांक १०-०५-२०२४ ते मिती वैशाख शुद्ध ५ रविवार दिनांक १२-५-२०२४ पर्यंत श्री राजेंद्र सानप अध्यक्ष, श्री भगवान बाबा व वामनभाऊ महाराज प्रतिष्ठान यांच्या आयोजनातून संपन्न होत आहे. या सोहळ्यात सकाळी ५ ते ६ काकडा ,६ ते ७ विष्णुसहस्रनाम, ७ ते १० पूजा ,अभिषेक, आरती. ११ ते १ गाथा भजन ,१ ते २ भोजन, दु.३ ते ५ ज्ञानेश्वरी प्रवचन, ५ ते ६ हरिपाठ, ८ ते १० हरिकीर्तन व नंतर जागर होईल.

दिनांक १०- ५- २०२४ रोज शुक्रवारी दुपारी ३ ते ५ या वेळेत हरिभक्ति परायण श्रीमंत महाराज शेळके बीड व हरिभक्तिपरायण रामहरी रसाळ गुरुजी बीड यांचे प्रवचन तर रात्री ८ ते १० या वेळेत हरिभक्तिपरायण पांडुरंग महाराज गुरु रामदास महाराज यांचे हरिकीर्तन होईल. दिनांक ११-५ -२०२४ रोज शनिवारी दुपारी ३ ते ५ हरिभक्ति परायण उमाशंकर महाराज शिंदे व कचरू महाराज चव्हाण बीड यांचे प्रवचन तर हरिभक्ति परायण रामकृष्ण रंधवे बापू पाटोदा यांचे रात्री ८ ते १० हरिकीर्तन होईल. दिनांक-५-२०२४ रोज रविवारी हरिभक्ति परायण ज्ञानेश्वर महाराज माऊली मंझरीकर यांचे सुश्राव्य काल्याचे किर्तन होऊन महाप्रसाद होईल. तरी पंचक्रोशीतील भाविक भक्तांनी या सोहळ्यात सहभागी होऊन आनंद द्विगुणीत करावा असे आवाहन भगवान बाबा प्रतिष्ठानचे अध्यक्ष श्री राजेंद्र सानप यांनी केले आहे.

# सैन्य भरती पूर्व प्रशिक्षण सूचना

बीड । प्रतिनिधी

भारतीय सैन्य दल नौदल व वायुदलामध्ये अधिकारी पदावर भरती होण्यासाठी पात्र उमेदवारांन या परीक्षेची पूर्वतयारी करून घेण्यासाठी छत्र पूर्व प्रशिक्षण केंद्र, नाशिक रोड, नाशिक येथे महाराष्ट्र शासनातर्फे महाराष्ट्रातील ; ; दिनांक २० मे २०२४ ते २९ मे २०२४ या कालावधीत कोर्स क्रमांक ५७ आयोजित करण्यात येत आहे. सदर कोर्ससाठी प्रशिक्षणार्थींची निवास, भोजन आणि प्रशिक्षणाची निशुल्क सोय करण्यात येणार आहे.

बीड जिल्ह्यातील इच्छुक उमेदवारांनी सैन्य दलातील अधिकारी पदाचे संधी उपभोगण्यासाठी जिल्हा सैनिक कल्याण कार्यालय बीड येथे दिनांक १५ मे २०२४ रोजी मुलाखतीस हजर राहावे. मुलाखतीस येतेवेळी त्यांनी यांच्या वेबसाईटवर सर्च करून त्यामधील -५७ कोर्ससाठी (किंवा सबंधित जिल्हा सैनिक कल्याण कार्यालयाने प्रिंट दिलेल्या) प्रवेश पत्र व त्यासोबत असलेली परिशिष्टाची प्रिंट घेऊन व ते पूर्ण भरून सोबत घेऊन यावे.सदर यशस्वी कोर्समध्ये प्रवेश मिळवण्यासाठी खाली नमूद कोणतीही एक पात्रता आवश्यक आहे व त्यासंबंधीचे पात्रता प्रमाणपत्र कोर्सला येताना सोबत घेऊन यावेत. कम्बाईन डिफेन्स सर्व्हिसेस एक्झामिशन अथवा नॅशनल डिफेन्स अकॅडमी एक्झामिनेशन पास झालेले असावे व त्यासाठी सर्व्हिसेस सिलेक्शन बोर्ड मुलाखतीसाठी पात्र झालेले असावेत.

एनसीसी सर्टिफिकेट किंवा ग्रेडमध्ये पास झालेले असावेत व एनसीसी ग्रुप हेडक्कॉर्टरने एसएसबी साठी शिफारस केलेली असावी. टेक्निकल ग्रॅज्युएट एस एस बी मुलाखतीसाठी कॉल लेटर असावे. विद्यापीठ प्रवेश प्रणाली साठी एसएसबी कॉल लेटर असावे किंवा एसएसबी साठी शिफारस घेतलेले यादीत नाव असावे. अधिक माहितीसाठी प्रभारी अधिकारी, छात्रपूर्व प्रशिक्षण केंद्र, नाशिक रोड, नाशिक यांचा ईमेल आयडी व दूरध्वनी क्रमांक ०२५३ -२४५०३२ किंवा व्हाट्सअप क्रमांक ९१५६०७३३०६ यावर कार्यालयीन वेळेत प्रत्यक्ष किंवा दूरध्वनीवरून संपर्क साधावा, असे आवाहन जिल्हा सैनिक कल्याण अधिकारी यांनी केले आहे.

# महात्मा बसवेश्वर जयंती १० मे रोजी सर्व कार्यालयात साजरी करावी- शेटे

परळी । प्रतिनिधी

जगद्ज्योती महात्मा बसवेश्वर जयंतीही प्रतिवर्षीप्रमाणे अक्षयतृतीयेला लिंगायत विरशैव समाजाच्या वतीने सर्वत्र फार मोठ्या उत्साहात साजरी केली जाते. यावर्षी शुक्रवार, दि.१० मे २०२४ रोजी आहे. कर्नाटक व त्या परिसरातील इतर शहरामध्येही फार धुमधडाक्यात ही जयंती साजरी केली जाते. कर्नाटक सरकारचे भवितव्य हे लिंगायत समाजावर आधारीत आहे.

महाराष्ट्र शासनाचा शासन निर्णय क्रमांक २२००/८१९ प्र.क्र.८९/२०००/२९ मंत्रालय मुंबई १२/४/२००१ नुसार महाराष्ट्रातील सर्व शासकीय कार्यालय निमशासकीय कार्यालय, विविध संस्था इत्यादी ठिकाणी विरशैव सामाजाचे आराध्य दैवत साम्यवादाचे जनक क्रांतीसूर्य, जगद्ज्योती महात्मा बसवेश्वर जयंती साजरी करावी असे आदेश आहेत. परंतु अनेक शासकीय कार्यालयात त्याची अंमलबजावणी होत नाही असे दिसून आलेले आहे. तरी या वर्षी शासन आदेशाची काटेकोरपणे अंमलबजावणी करावी असे सन्माननीय जिल्हाधिकारी यांनी बीड आदेश जिल्ह्यामधील सर्व शासकीय कार्यालयांना निदेर्शीत करावेत अशी मागणी लिंगायत संघर्ष समितीचे महाराष्ट्राचे मुख्य समन्वयक काकासाहेब कोयटे, प्रदेश उपाध्यक्ष राजेंद्रअप्पा मुंडे, बीड जिल्हाध्यक्ष आत्मलिंग शेटे यांनी केलेली आहे. दरम्यान, दि. १० मे रोजी अक्षयतृतीयेच्या दिवशी मोठ्या मानसन्मानाने क्रांतीसूर्य जगद्ज्योती महात्मा बसवेश्वर यांची जयंती सर्व विरशैव लिंगायत समाज बांधवांनी, भगीनी माताने मोठ्या उत्साहात व आपआपल्या घरी व सार्वजनिक ठिकाणी समाज मंदिरात शांततेत साजरी करावी असे आवाहन लिंगायत संघर्ष समितीचे जिल्हाध्यक्ष आत्मलिंग शेटे यांनी केले आहे.

# निवडणूक निरीक्षक यांच्या समक्ष मतदान केंद्राचे बीयु, सीयु आणि व्हीव्हीपॅट यांची सरमिसळ

बीड । प्रतिनिधी

बीड लोकसभा मतदारसंघात १३ मे रोजी निवडणूक होणार असून आज निवडणूक निरीक्षक अजीमुल हक यांच्या समक्ष सहा विधानसभा निहाय मतदान केंद्राच्या ठिकाणी असणाऱ्या बॅलेट युनिट कंट्रोल युनिट आणि व्हीव्हीपॅट यंत्रांची सरमिसळ आज करण्यात आली. यावेळी जिल्हाधिकारी तथा जिल्हा निवडणूक अधिकारी दीपा मुधोळ मुंडे, अपर जिल्हाधिकारी डॉ. त्रिगुण कुलकर्णी, उपजिल्हा निवडणूक अधिकारी महेंद्र कुमार कांबळे उपस्थित होते. यासह विविध राजकीय पक्षातील प्रतिनिधी यांच्यासमोर ही प्रक्रिया पार पाडण्यात आली.

बीड लोकसभा मतदारसंघात ४१ उमेदवार निवडणुकीच्या रिंगणात उभे आहेत. दोन अधिक बॅलेट युनिट लागणार होते. त्याप्रमाणे २८०० अधिकचे बॅलेट युनिट मागविण्यात आलेले आहेत. यासह वखार महामंडळात ठेवलेले बीयु. सीयु आणि



व्हीव्हीपॅट यांची आणि नव्याने आलेले २८०० बॅलेट युनिटची सरमिसळ शनिवारी करण्यात येऊन विधानसभा निहाय मतदान मशीन पोहोचविण्यात आलेले आहेत. आज सहा विधानसभामध्ये पोहोचविण्यात आलेल्या सीयु, बीयु आणि व्हीव्हीपॅट यांची सरमिसळ ही मतदान केंद्र निहाय करण्यात आली. गेवराई विधानसभा मतदान संघातील ३९७ मतदान केंद्रांसाठी १४५७ बॅलेट युनिट ५५८ कंट्रोल युनिट आणि ६०१ व्हीव्हीपॅट ठेवण्यात येणार आहेत. माजलगाव विधानसभा मतदार संघातील ३७९ मतदान केंद्रांसाठी १३९० बीयु, ५३६ सीयु आणि ५७७ व्हीव्हीपॅट ठेवण्यात येणार आहेत. बीड विधानसभा मतदारसंघातील ३८२ मतदान केंद्रांसाठी १४०३ बीयु , ५४० सीयु आणि ५८१ व्हीव्हीपॅट ठेवण्यात येणार आहेत. आष्टी विधानसभा मतदारसंघातील ४४० मतदान केंद्रांसाठी १६३८ बीयु, ६१३ सीयु, ६५७ व्हीव्हीपॅट ठेवण्यात येणार आहेत. परळी विधानसभा मतदारसंघातील ३४२ मतदान केंद्रांसाठी १२४८ बीयु, ४९० सीयु, ५२९ व्हीव्हीपॅट ठेवण्यात येणार आहेत. असे एकूण ८६८१ बीयु, ३३१७ सीयु, ३५६९ व्हीव्हीपॅट लागणार आहेत. आज झालेल्या सरमिसळ अंतर्गत कोणत्या मतदान केंद्रात कोणते मशीन ठेवण्यात येईल याची माहिती विधानसभा मतदार संघाच्या सहाय्य निवडणूक अधिकारी यांना देण्यात आली असून त्याप्रमाणे याचे कमिशनिंग करण्यात येईल. १३ मे रोजी मतदान झाल्यानंतर विधानसभा निहाय मतदान केंद्रातील मतदान मशीन शासकीय तंत्रनिकेतन येथे विधानसभा निहाय ठेवण्यात येतील. यावेळी किती मशीन नादुरुस्त आहेत आणि त्या ऐवजी मतदान प्रक्रियेत वापरलेल्या मशीनीची माहिती राजकीय प्रतिनिधींना देण्यात येईल.

### खर्च निरीक्षक ८ मे रोजी करणार निवडणूक लेखांची तपासणी

निवडणूक खर्च निरीक्षक सुसांता कुमार बिस्वास हे ८ मे रोजी निवडणूक लेखांची तपासणी जिल्हाधिकारी कार्यालयातील नियोजन सभागृहात करणार आहेत. अशी माहिती निवडणूक खर्च संनियंत्रण कक्षाच्यावतीने कळविण्यात आले आहे. ३९ बीड लोकसभा मतदारसंघात सोमवार दिनांक १३ मे रोजी मतदान होणार आहे. त्या अनुषंगाने लोकसभा निवडणुकीमध्ये उभे राहणाऱ्या उमेदवारांना केलेल्या खर्चाची लिखित नोंद ठेवावी लागते. भारत निवडणूक आयोगाच्या सूचनेनुसार या लेखांची तपासणी निवडणूक खर्च निरीक्षक यांच्याकडून केली जाते. यापूर्वी ४ मे रोजी ही तपासणी करण्यात आली असून दुसरी तपासणी ८ मे रोजी होणार आहे. उमेदवारांना नोंदवही दिलेले असून त्यांनी हा खर्च व्यवस्थितरित्या लिहिलेला आहे की नाही याची तपासणी करण्यासाठी ८ मे रोजी जिल्हाधिकारी कार्यालयातील नियोजन सभागृहात सकाळी १० ते सांय. ५ वाजता खर्च निरीक्षक सुसांता कुमार बिस्वास हे करणार आहेत.

cmyk

दैनिक राज्य लोकतंत्र

महासंग्राम

मंगळवार, दि.७ मे २०२४ | ६

# स्व.गोपीनाथ मुंडेंचे अपूर्ण स्वप्न पूर्ण करण्यासाठी पंकजा मुंडेंना विजयी करा -मंत्री बबनराव लोणीकर

## मतदारसंघाच्या सर्वांगिण विकासासाठी पंकजाताईंचा विजय महत्वाचा-आ.लक्ष्मण पवार

**गेवराई । प्रतिनिधी**

सर्वसामान्य माणसाचा विकास झाला पाहिजे आणि तरुणांच्या हाताला काम मिळालं पाहिजे आणि या राज्याचा आणि या देशाचा कायापालट झाला पाहिजे आणि म्हणून ही निवडणूक आपल्यासाठी तुमच्यासाठी माझ्यासाठी खूप महत्त्वाची आहे यानिवडणुकीमध्ये आपण ग्रामपंचायतीला ज्या ताकतीने लढतो ज्या ताकतीने आपण जिल्हा परिषद पंचायत समितीला लढतो ज्या ताकतीने आपण नगरपालिकेमध्ये लढतो ज्या ताकतीने तुम्ही विधानसभेमध्ये लढतो त्यापेक्षा दुप्पट ताकतीने आपल्याला लढायचं आहे आणि पंकजा मुंडे यांना भरघोस मताने दिल्लीमध्ये खासदार म्हणून पाठवायचा आहे पंकजा मुंडे खासदार झाल्यानंतर मोदी जी अमित शहाजी हजार टक्के त्यांना मंत्री करणार आहे गोपीनाथराव मुंडे ग्रामविकास मंत्री केंद्रात झाले फार वेळ त्यांना काम करायला संधी मिळाली नाही परमेश्वरांना आघात केला आणि आघात मध्ये मुंडे साहेब आपल्यातून गेले गोपीनाथ मुंडेचे अपुर्ण स्वप्न पूर्ण करण्यासाठी पंकजाताई मुंडेना प्रचंड मताधिक्य द्या असे आवाहन मा.मंत्री बबनराव लोणीकर यांनी केले आहे

यावेळी बोलतांना आ.लक्ष्मण पवार म्हणाले केंद्र व सरकारच्या माध्यमातून आपण मोठ्या प्रमाणात निधी खेचून आणुन गेवराई मतदारसंघाचा विकास साधला आसल्याचे आ.पवार म्हणाले पुढे बोलतांना ते म्हणाले की

बबनराव लोणीकर आज तलवाडा येथे पंकजाताईच्या प्रचारासाठी आले आहेत लोणीकर साहेबांनी त्यांच्या मतदारसंघांमध्ये पिण्याच्या पाण्यासाठी प्रत्येक ठिकाणी फिल्टर लावून त्या फिल्टर प्लांट च्या माध्यमातून २०० गावांना ते आज शुद्ध पाणी देत आहेत.महायुतीच्या उमेदवाराला निवडून दिल्यानंतर किंवा मतदान केल्यानंतर आपल्या अडचणी कमी होतील याचा विचार करुन भाजपला मत म्हणजे पंतप्रधान नरेंद्र मोदी यांना मत आहे.लोकसभा निवडणुकीचा प्रचारार्थ आज दि.६ रोजी गेवराई तालुक्यातील तलवडा व जातेगाव येथे पंकजाताई मुंडे यांच्या प्रचारार्थ आ.बबनराव लोणीकर व आ.लक्ष्मण पवार यांच्या उपस्थितीत कॉर्नर बैठक संपन्न झाली.यावेळी विश्वजित खरात,सुशील जवंजाळ, राजेंद्र राक्षसभुवनकर, भगवान घुबार्डे,दादासाहेब गिरी,जे.डी.शहा,बंडूभाऊ बारगजे, दत्ता जाधव, पांडुरंग थडके,विठ्ठल हात्ते,आबुराव कर्वे, कुंड , विनोद सौंदरमल, राजाभाऊ आर्दड, प्रितम गर्जे,अभिजित मरकड,शेख मोहम्मद, शेख सिराज,आयाज कुरेशी,सागर शर्मा,सचिन वावरे, ईश्वर पवार, श्रीराम घाटुळ,महादेव खटके,पापा पंडीत, आदी उपस्थित होते




**पंकजाताईंच्या प्रचारार्थ आ.लोणीकर व आ.पवारांच्या उपस्थितीत कॉर्नर बैठक संपन्न**

# नरेंद्र मोदींना सत्तेतून तडीपार करण्याकरिता बजरंग सोनवणे यांना विजयी करा: प्रा. सुशीलाताई मोराळे

## उद्धव बाळासाहेब ठाकरे यांची सहानुभूती व आघाडी धर्म शिवसैनिकांनी पाळला -शेख निजाम

**बीड । प्रतिनिधी**

२०१४ साली सत्तेत येणारे नरेंद्र मोदी नेहमी खोटे बोलून दिशाभूल करण्याचे प्रयत्न करीत आहात दहा वर्षात विकास काम केले नसल्याने ते काँग्रेस व इतरांचे नाव घेऊन राजकारण करीत आहे असे लोकांना सत्तेतून तडीपार करणे गरजेचे आहे म्हणून बीड मतदारसंघाचे महाविकास आघाडीचे उमेदवार बजरंग सोनवणे यांचे निवडणूक चिन्ह तुतारी वाजविणारा माणूस समोरील बटन दाबून बहुमताने विजयी करण्याचे आवाहन राष्ट्रवादी काँग्रेसची नेत्या प्राध्यापक सुशीला मोराळे यांनी मोहम्मदया कालोनी या ठिकाणी शिवसेना शहर प्रमुख शेख निजाम यांचे वतीने आयोजित कॉर्नर बैठकीत केले. या बैठकीचे वैशिष्ट्ये हे ठरले की या बैठकीत जे सभेत रूपांतर झाले महिलांची विशेष उपस्थिती होती.



शेख निजाम यांचे वतीने आयोजित करण्यात आलेले या बैठकीत माजी मंत्री सुरेश नवले, शिवसेनेचे जिल्हाप्रमुख परमेश्वर सातपुते, आप पक्षाचे जिल्हाध्यक्ष अशोक येडे समाजवादी पक्षाचे जिल्हाध्यक्ष खमरूल ईमान खान, पंडित तुपे, प्राध्यापक शेख अमर, मौलाना अखिल, हाफिस अश्फाक ,शफीक कुरेश,मोमीन जुबैर,सय्यद फहीम, आदी उपस्थित होते. यावेळी मार्गदर्शन करताना पंडित तुपे यांनी केंद्र सरकारवर हल्लाबोल करून करून सांगितले की जातीवादी पसरून भारतीय जनता पक्ष राजकारण करीत आहे कोणालाही वेगवेगळे भावात गॅस सिलेंडर भेटत नाही परंतु निवडणूक आले तर त्यांना जात धर्म लक्षात येते अशा सरकारला सत्तेतून हटवून परिवर्तन घडविणे गरजेचे आहे गरजेचे आहे तर समाजवादी पक्षाचे जिल्हाध्यक्ष खमरूल ईमान यांनी मताचे विभाजन करण्यासाठी उभे राहणारे अपक्ष उमेदवारांचे समाचार घेत प्रत्येक निवडणुकीत पक्ष बदलणारे समाजाचे ◀◀ पान ३ वर

# राष्ट्रवादी नगरसेवकाची चंदन तस्करी उघडकीस आली, अन् शरदचंद्र पवारांनी आष्टीची सभाच रद्द केली..!

**बीड । प्रतिनिधी**

सुमारे दोन कोटी रुपयाची चंदन तस्करीची चोरी केज पोलिसांनी पकडली. त्यात बीड लोकसभा मतदार संघात महाविकास आघाडीच्या वतीने निवडणूक लढवणारे बजरंग सोनवणे यांचे निकटवर्ति नव्हे तर प्रचारात प्रमुख असलेले बालाजी जाधव नगरसेवक केज तथा शरद पवार राष्ट्रवादी गटाचे असल्याचे पोलिस तपासात निष्पन्न झाल्यानंतर राज्यभरत खळबळ उडाली. या घटनेची गंभीर दखल दस्तूर खुद शरदचंद्र पवारांनी घेतली आणि स्वत:च अंतरमुख होऊन सोनवणे यांच्या प्रचारासाठी दिलेली सभा रद्द केल्याची चर्चा राजकीय वर्तुळात जोरदार होताना दिसते. एवढेच नव्हे तर प्रकरण पुढे आल्यानंतर फार मोठा फटका सोनवणे यांना बसू शकतो.



### रमेश आडसकरांचा हल्ला, उमेदवारांची औकात ओळखा!

**या लोकसभा मतदार संघात पंकजाताई मुंडे यांच्या विरोधात महावीकास आघाडीकडून निवडणुकीत उभे असलेले बजरंग सोनवणे यांच्या निकटवर्ति यांचा दोन कोटी रुपयांच्या चंदन तस्करीत असलेला सहभाग पुढे आल्यानंतर एवढी मोठी तस्करी करणाऱ्यासाठी शरदचंद्र पवार पुढे येतील कसे ? आशा माणसाचा प्रचार आपल्याला सोबत नाही हे लक्षात आल्या बरोबरच आष्टीची सभा रद्द केल्याची प्रतिक्रिया भाजपा नेते रमेश आडसकर यांनी दिली. जिल्ह्यातील मतदार जनतेने उमेदवार कसे आहेत हे आता ओळखणे महत्वाचे**

लोकसभा निवडणुकीच्या रणधुमाळीत केजला दोन कोटी रुपयाचे चंदन तस्करी पोलिसांनी कारवाई करून मुद्दे माल शिवाय आरोपी सह पकडल्यानंतर जिल्ह्यात राजकीय खळबळ उडाली. विशेष म्हणजे महावीकास आघाडीचे उमेदवार बजरंग सोनवणे यांच्या कर्म भूमीतच चंदन चोरी प्रकार उघडा पडला. यातले आरोपी बालाजी जाधव राष्ट्रवादी शरद पवार गटाच्या पक्षाचे नगरसेवक आणि बजरंग सोनवणे यांचे निकटवर्ति म्हणून ओळखले जातात. दोनही आरोपी सोनवणे यांच्या प्रचारात खुले आम फिरत होते. ज्याचे छायाचित्र देखील सोशल मिडियावर प्रसिद्ध झाले. उमेदवारी मिळाल्या नंतर किसान पुत्र नावाने उपाधी लाऊन सोनवणे यांनी घेतली खरी मात्र चंदन चोरी मुळे किसान पुत्राचा खरा चेहरा समोर आला. शरद पवारांच्या राष्ट्रवादी पक्षाला अंतरमुख करायला लावणारी सदर घटना गंभीर म्हणावी लागेल. असे उमेदवार बीडच्या जनतेच्या समोर साहेबांनी का लादले हा सवाल आता मतदारच करू ◀◀ पान ३ वर

# दिवंगत गोपीनाथराव मुंडे यांचे जिल्ह्याच्या विकासाचे स्वप्न पूर्ण करण्यासाठी पंकजाताई मुंडे यांना विजयी करा- गणेश उगले

**बीड । प्रतिनिधी**

जिल्ह्याचे भूमिपुत्र आणि महाराष्ट्राचे माजी उपमुख्यमंत्री दिवंगत गोपीनाथरावजी मुंडे हे मे २०१४ च्या मोदी साहेबांच्या मंत्रिमंडळात केंद्रीय ग्रामविकास मंत्री झाले होते पण बीड जिल्ह्याचे यहे भाग्य आउट घटकेचे ठरले आणि मंत्री झाल्यानंतर नामदार मुंडे साहेब यांचे अपघाती निधन झाले. नियतीचे हे शल्य जिल्ह्यातील प्रत्येक माणसांच्या मनात आहे. जर गोपीनाथराव मुंडे साहेब पाच वर्षे तत्कालीन मोदी सरकार मध्ये ग्रामविकास मंत्री राहिले असते तर जिल्ह्यातील सहा विधानसभा मतदारसंघाचा विकासाच्या बाबतीत चेहरा मोहरा



त्यांनी नक्कीच बदलला असता. आता पुन्हा एकदा संघर्ष नेत्याची संघर्ष कन्या माननीय सौ. पंकजाताई गोपीनाथराव मुंडे या बीड लोकसभेची शिवसेना, भारतीय जनता पक्ष व इतर मित्र पक्षांच्या महायुतीच्या वतीने बीड लोकसभेची निवडणूक लढवत आहेत. जिल्ह्यामध्ये महाविकास आघाडीच्या नेत्याकडून जातीचा बुद्धिभेद करून मते मिळविण्याचा केविलवाणा प्रयत्न होत आहे परंतु बीड जिल्हा हा क्रांतिकारकांचा आणि संतांचा जिल्हा म्हणून ओळखला जातो. जातीयवादाला खतपाणी घालणाऱ्या प्रवृत्तीला आळा घालून या ठिकाणी विकास या एकाच जातीला मतदान केले जाते हा इतिहास आहे. म्हणून येत्या १३ मे रोजी पंकजाताई मुंडे यांच्या कमळ या चिन्हा समोरील बटन दाबून पंकजाताईला मुंडे साहेबांचे अधुरे स्वप्न पूर्ण करण्यासाठी जिल्ह्यातील जनता लोकसभेत पाठवणार असल्याचे प्रतिपादन ◀◀ पान ३ वर



# पंकजाताई मुंडे यांना महात्मा फुले युवा दलाचा जाहीर पाठिंबा

**बीड । प्रतिनिधी**

बीड जिल्ह्यामध्ये माळी समाजात सक्रिय आणि लोकप्रिय असलेल्या महात्मा फुले युवा दलाच्या वतीने बीड लोकसभा मतदारसंघाच्या भाजपा महायुतीच्या उमेदवार पंकजाताई मुंडे यांना जाहीर पाठिंबा देण्यात आला. बीड जिल्हाध्यक्ष अजय शिंदे यांच्यासह पदाधिकाऱ्यांनी प्रत्यक्ष भेटून पंकजा ताईंना पाठिंबाचे पत्र दिले. ◀◀ पान ३ वर

# मी विकासाच्या मुद्यावर निवडणूक लढतोय-बजरंगबप्पा सोनवणे

**माजलगाव । प्रतिनिधी**

निवडणूक जात-पात धर्म, याच्याही पलीकडे जाऊन जनतेचा विकास या मुद्द्यावर लढली पाहिजे, कारण जात पात आणि धर्म या गटात विभागणी करणे हे निवडून आलेल्या लोकप्रतिनिधीचे काम नसते, जनतेचा विकास करण्याचे कार्य हे लोकप्रतिनिधीने केले पाहिजे, म्हणून बीड जिल्ह्यातील जनतेच्या विकासाच्या मुद्द्यावर मी निवडणूक लढत आहे, असे महाविकास आघाडीचे बजरंग बप्पा सोनवणे यांनी प्रचार सभेत बोलताना सांगितले, ते तालुक्यातील मोठेवाडी येथील कार्यकर्ता मेळाव्यात बोलत होते.

वास्तविक पाहता माजलगाव तालुका आणि बीड जिल्हा हे चळवळीचे केंद्र बनलेले होते, येथील जनतेच्या विकासासाठी अनेक लोकप्रतिनिधींनी चांगले काम केले, ऊस, कापूस तसेच येथे पिकणाऱ्या शेतमालाला योग्य भाव देऊन शेतकऱ्यांचे हित आणि शेतमजुरालाही काही शासकिय सवलती देऊन त्यांचे हित करण्यासाठी सरकार समोर जिल्ह्यातील प्रश्न मांडले पाहिजेत, त्या माध्यमातून विकास केला पाहिजे हे माझे धोरण राहील, असे मोठे वाडी येथे कार्यकर्ता मेळाव्यात बजरंग बप्पा सोनवणे यांनी सांगितले. बीड जिल्ह्याचा विकास करणे हे आपले ध्येय असेल त्यासाठी सर्वांनी साथ द्यावी असे आवाहन केले. या वेळी जि.प.सदस्य चंद्रकांत शेजुळ,नारायण डक, दयानंद स्वामी, भाई गंगाभिषण थावरे, कचरूतात्या खळगे, अभय होके, बालासाहेब जाधव मनोहर डाके, कॉ. मुत्सद्दीक बाबा,मनोज फरके,तनमय होके यांची उपस्थिती होती.या कार्यक्रमाचे प्रास्ताविक शिवसेना समन्वयक संभाजी पास्टे यांनी केले.यावेळी गावातील कार्यकर्त्यांसह नागरिकांची मोठ्या संख्येने उपस्थिती होती.




# नाशिकमध्ये महायुतीला दिलासा, अपक्ष उमेदवार अनिल जाधव यांचा अर्ज मागे

**नाशिक । प्रतिनिधी**

नाशिक लोकसभा मतदारसंघात महायुतीला मोठा दिलासा मिळाला असून अपक्ष उमेदवार अनिल जाधव यांनी अर्ज मागे घेतला आहे. महायुतीसमोरील एक आव्हान यामुळे आता कमी झाले आहे.

अनिल जाधव हे भारतीय जनता पार्टीचे पदाधिकारी आहेत. अनेक वर्षापासून ते भारतीय जनता पार्टीत सक्रीय आहेत. नाशिक लोकसभा मतदारसंघावर भाजपनेही आपला दावा दाखल केला होता. मात्र, वाटाघाटीत ही जागा शिंदे गटाला गेल्याने शिंदे गटाचे विद्यमान खासदार हेमंत गोडसे यांनाच नाशिकची महायुतीकडून उमेदवारी जाहीर झाली. तसेज अजित पवार गटाचे निवृत्ती अरिंगळे यांनीही माघार घेतली आहे. त्यामुळे नाशिक लोकसभा मतदारसंघातील महायुतीचे उमेदवार हेमंत गोडसे यांना दिलासा मिळाला आहे.



# पंकजाताईंना माजलगाव मतदारसंघातून मतांची आघाडी देणार-मोहन जगताप

## बबनराव लोनीकरांच्या उपस्थितीत भाजप कार्यकर्त्यांची बैठक उत्साहात संपन्न

**माजलगाव । प्रतिनिधी**

लोकसभेच्या निवडणुकीत माजलगाव मतदासंघांतून भाजप उमेदवार पंकजा मुंडे यांना मतांची आघाडी देणार असल्याचा विश्वास भाजप निवडणुक प्रमूख मोहन जगताप यांनी माजी मंत्री बबनराव लोणीकरांच्या उपस्थितीत भाजप कार्यकर्त्यांच्या झालेल्या बैठकीत व्यक्त केला.

आज शहरातील मध्यवर्ती भाजप कार्यालयात माजी मंत्री तथा लोकसभा सहनिरीक्षक बबनराव लोणीकरांच्या उपस्थितीत भाजप कार्यकर्त्यांची आढावा बैठक संपन्न झाली. या बैठकीस भाजप नेते तथा विधानसभा निवडणूक प्रमूख मोहन जगताप, डॉ प्रकाश आनंदगावकर, नितीन नाईकनवरे, भाजप तालुकाध्यक्ष अरुण राऊत,सिद्धेश्वर संकुलाचे माजी कार्यवाह तथा भाजप नेते अमरनाथ खुर्पे,डॉ.प्रशांत पाटील,हनुमान कदम यांची प्रमूख उपस्थिती होती या प्रसंगी बबनराव लोणीकरांनी संबोधित करताना तालुक्यातील विविध बुथांचा आढावा घेऊन भाजप कार्यकर्त्यांना सविस्तर मार्गदर्शन केले. या वेळी मोहन जगताप यांनी नरेंद्र मोदी सरकार तिसऱ्यांदा सत्तेत येणारच आहे त्यात बीड जिल्ह्याचेही योगदान असावे अशी अपेक्षा व्यक्त करून माजलगाव मतदासंघांतून पंकजा मुंडे यांना मतांची ◀◀ पान ३ वर



# कन्हैया कुमार यांचा उत्तर पूर्व दिल्ली लोकसभेसाठी उमेदवारी अर्ज दाखल



**नवी दिल्ली । वृत्तसेवा**

उत्तर पूर्व दिल्ली लोकसभा मतदारसंघातून काँग्रेसचे उमेदवार कन्हैय्या कुमार यांनी सोमवारी (६ मे) रोड शो करत उमेदवारी अर्ज दाखल केला. यावेळी काँग्रेसच्या नेत्यांसह दिल्लीचे मंत्री आणि आपचे दिल्ली प्रदेशाध्यक्ष गोपाल राय उपस्थित होते. कन्हैय्या कुमार यांच्याविरोधात भाजपने विद्यमान खासदार मनोज तिवारी यांना पुन्हा उमेदवारी दिली आहे. कन्हैय्या कुमार यांना काँग्रेसने उमेदवारी जाहीर केल्यावर दिल्ली काँग्रेसमध्ये नाराजीचा सूर पाहायला ◀◀ पान ३ वर

This leaflet printed by the printer, publisher, owner Seema Bhimrao Maske at Jagmitra Printers And Sales Corporation Sumati Nagar, Jalana Road Beed printed here, Office Dainik Rajya Loktantra, Rajiv Gandhi Chowk Canol Road Beed, Tal. Dist.Beed 431122 (maharashtra) Published at. Editor Seema Bhimrao Maske, Executive Editor Ashok Nagorao Khade. Editors do not necessarily agree with the opinions expressed in the text. Court case in Beed tribunal. Email -rajyaloktanatra75@gmail.com NO.L SB/BEED/RNP-206/2024-26

हे पत्र मुद्रक, प्रकाशक, मालक सीमा भिमराव मस्के यांनी जगमित्र प्रिंटर्स अँड सेल्स कॉर्पोरेशन सुमती नगर, जालना रोड, बीड येथे छापून कार्यालय दैनिक राज्य लोकतंत्र, राजीव गांधी चौक कॅनॉल रोड बीड, ता.जि.बीड-४३११२२(महाराष्ट्र) येथे प्रकाशित केले. संपादक-सीमा भिमराव मस्के, कार्यकारी संपादक - अशोक नागोराव खाडे या अंकात प्रकाशित झालेल्या मजकुरातील मतांशी संपादक सहमत असतीलच असे नाही. न्यायालयीन वाद बीड न्यायकक्षेत. : ईमेल - rajyaloktantra75@gmail.com NO.L SB/BEED/RNP-206/2024-26

cmyk

दैनिक राज्य लोकतंत्र
नवी दिशा...नवे विचार...

पुणे विशेष

मंगळवार दि.७ मे २०२४ । पान ७

# जिल्ह्यात एक कोटी ४० लाख क्विंटल साखर उत्पादन तयार : गतवर्षापेक्षा अधिक ऊसगाळप

**पुणे । प्रतिनिधी**

पुणे जिल्ह्यातील ऊस संपल्याने २०२३-२४ मधील ऊसगाळप हंगाम आता संपुष्टात आला आहे. साखर आयुक्तालयाकडून प्राप्त अहवालानुसार जिल्ह्यातील १४ कारखान्यांकडून एक कोटी ३२ लाख ४४ हजार २६७ टन उसाचे गाळप पूर्ण केले आहे. त्यातून १०.५७ टक्के सरासरी उतार्यानुसार एक कोटी ४० लाख ४ हजार ४०७ क्विंटलइतके साखर उत्पादन तयार झाले आहे. गतवर्षी एक कोटी २६ लाख ९१ हजार ६५८ टनइतके ऊसगाळप पूर्ण झाले होते. याचा विचार करता सुमारे पाच लाख ५२ हजार ६०९ टनांनी जादा ऊसगाळप झाल्याचे स्पष्ट झाले आहे.

जिल्ह्यात सर्वाधिक बारामती अ‍ॅग्रो लिमिटेड या खासगी साखर कारखान्याने २१ लाख ५४ हजार ७९४ टनाइतके सर्वाधिक ऊसगाळप केले आहे. तर ९.३३ टक्के उतार्यानुसार १९ लाख ८६ हजार ७२५ क्विंटलइतके सर्वाधिक साखर उत्पादन तयार केले आहे. त्या नंतर दौंड शुगर प्रा.लि. हा खासगी कारखाना दुसर्या स्थानावर आहे. या कारखान्याने १८ लाख एक हजार ८७७ टन उसाचे गाळप पूर्ण केले आहे. त्यांनी ९.५७ टक्के उतार्यानुसार १७ लाख २६ हजार २०० क्विंटलइतके साखर उत्पादन तयार केले आहे. यामध्ये बारामती अ‍ॅग्रोचा साखर उतारा ९.३३ टक्के तर दौंड शुगरचा उतारा ९.५७ टक्के आहे.



तर दुसरीकडे १४ कारखान्यांमध्ये जिल्ह्यात ११.९६ टक्क्यांइतका सर्वाधिक साखर उतारा मिळवत सोमेश्वर सहकारी साखर कारखान्याने अग्रस्थान पटकाविले आहे. या कारखान्याने १५ लाख २३ हजार ८७६ टनाइतके ऊसगाळप करत तिसरे स्थान पटकाविले असून, साखर उत्पादनात दुसरे स्थान मिळवले आहे. या कारखान्याने तब्बल १८ लाख २६ हजार ५०० क्विंटलइतके साखर उत्पादन तयार केले आहे.

# पुण्यात उभारणार इस्लामिक शैक्षणिक विद्यापीठ : अनिस सुंडके

पुणे : : पुणे हे जगात आपल्या शैक्षणिक आणि सांस्कृतिक वैभवासाठी ओळखले जाते. पुण्याला विद्येचे माहेरघर तसेच सांस्कृतिक राजधानी म्हणूनदेखील ओळखले जाते. विविध धार्मिक सणदेखील पुण्यात मोठ्या उत्साहात साजरे केले जातात. पुण्याच्या या वैभवात भर पडावी म्हणून उत्तरप्रदेशातील देवबंद विद्यापीठाच्या धर्तीवर पुण्यात इस्लामिक धार्मिक अभ्यासाचे केंद्र उभारण्याचा मनसुबा एमआयएम पक्षाचे उमेदवार अनिस सुंडके यांनी जाहीर केला.



या इस्लामिक शैक्षणिक विद्यापीठात मुस्लिम विद्यार्थ्यांना इस्लाम धर्माची शिकवण तसेच इतर अभ्यासक्रमदेखील शिकवले जातील. ऑक्सफर्ड ऑफ ईस्ट म्हणवल्या जाणार्या पुण्यामध्ये यामुळे आणखी भर पडणार आहे. पुण्यातील कॅम्प परिसरातील प्रचार रॅलीदरम्यान सुंडके यांनी उपस्थित मतदारांशी संवाद साधला.

मुस्लिम विद्यार्थ्यांसाठी इस्लामचे शिकवण देण्यासाठी फारशा शिक्षण संस्था पुण्यामध्ये नाहीत. त्यामुळे जनतेने जर मला निवडून दिले, तर मी पहिले काम मुस्लिम विद्यार्थ्यांसाठी विद्यापीठाची स्थापना करेन, असे अनिस सुंडके म्हणाले. कॅम्प परिसरातील रॅलीला नागरिकांचा भरघोस प्रतिसाद मिळाला. मोठ्या संख्येने कार्यकर्ते रॅलीमध्ये सामील झाले होते.

# उड्डाणपुलासाठी खोदलेल्या खड्ड्यामध्ये कार कोसळली

**पुणे । प्रतिनिधी**

सिंहगड रस्त्यावर वडगाव बुद्रुक येथील फन टाइम चित्रपटगृहासमोर सुरू असलेल्या उड्डाणपुलाच्या कामासाठी खोदण्यात आलेल्या खड्ड्यात रविवारी दुपारी दीडच्या सुमारास कार कोसळली. सुदैवाने या अपघातात कोणीही जखमी झाले नाही. दरम्यान, या ठिकाणी वाहनचालक व नागरिकांच्या सुक्षिततेच्या दृष्टीने कोणत्याही उपाययोजना करण्यात आलेल्या नसल्याचे चित्र दिसून येत आहे.



सिंहगड रस्त्यावरून धायरीकडून पुण्याच्या दिशेने जात असताना चालकाचे नियंत्रण सुटल्याने ही कार फन टाइम चित्रपटगृहासमोर उड्डाणपुलाच्या बांधकामासाठी खोदण्यात आलेल्या खड्ड्यात कोसळून उलटी. नशीब बलवत्तर म्हणून सुदैवाने चालक बचावला. या घटनेची माहिती मिळताच सिंहगड वाहतूक शाखेचे सहायक पोलिस निरीक्षक राजकुमार बर्डे यांच्या मार्गदर्शनाखाली पोलिस हवालदार दयानंद गायकवाड, अशोक कदम, राहुल बांडे यांनी तत्काळ घटनास्थळी धाव घेतली. नागरिकांच्या मदतीने कारचे दरवाजे तोडून चालकाला सुखरून बाहेर काढले आणि उपचारासाठी दवाखान्यात दाखल केले. दरम्यान, या अपघातामुळे सिंहगड रस्त्यावर वडगाव उड्डाणपुलापर्यंत वाहनांच्या रांगा लागल्या होत्या. वाहतूक पोलिसांनी काही वेळात वाहतूक सुरळीत केली. क्रेनच्या साहाय्याने खड्ड्यात कोसळलेली कार बाहेर काढली.

फन टाइम चित्रपटगृह ते राजाराम पुलापर्यंत उड्डाणपुलाचे काम सुरू आहे. परंतु, हे काम करताना नागरिक व वाहनचालकांच्या सुक्षिततेच्या दृष्टीने कोणत्याही उपाययोजना केल्या नसल्याचे दिसून येत आहे. यामुळे जीव मुठीत घेऊन प्रवास करावा लागत आहे. याकडे महापालिका प्रशासनाचे दुर्लक्ष होत असल्याचे नागरिकांनी सांगितले. तसेच, कामाच्या ठिकाणी सुरक्षारक्षक दिसून येत नसल्यामुळे वारंवार वाहातूक कोंडी होत असल्याचे चित्र दिसून येत आहे.

# खडकवासला धरणसाखळीत २६ टक्के साठा; पाणीकपातीचे आवाहन

**वेल्हे । प्रतिनिधी**

पुणे शहर व जिल्ह्यातील जवळपास एक कोटी रहिवाशांची तसेच हवेली, दौंड, इंदापूर आदी तालुक्यातील ६६ हजार हेक्टर शेतीची तहान भागवणार्या खडकवासला धरणसाखळीत गतवर्षी पेक्षा १० टक्के पाणीसाठा शिल्लक आहे. रविवारी (दि. ५) दिवस अखेर चार धरणांच्या साखळीत ७.५४ टीएमसी म्हणजे फक्त २५ . ८८ टक्के पाणीसाठा शिल्लक होता. गेल्या वर्षी आजच्या दिवशी ५ मे २०२३ रोजी धरणसाखळीत १०.३४ टीएमसी म्हणजे ३५.४६ टक्के पाणी होते.गतवर्षीच्या तुलनेत पाणीसाठा कमी असल्याने प्रशासनासमोर पाणी कपातीचे आवाहन उभे आहे.



सध्या शेतीसाठी सध्या उन्हाळी आवर्तन सुरू आहे. धरणांतील पाण्याची पातळी खाली गेल्याने पानशेतची पातळी माणगाव, शिरकोलीपर्यंत खाली गेली आहे. रुळे, जांबली येथील मोसे नदीचे पात्र उघडे पडले आहे. उघड्या पडलेल्या धरण क्षेत्रात गाळ, मातीचे तांडे दिसत आहेत. गेल्या महिन्यापासून उन्हाची तीव्रता वाढली आहे. त्यामुळे पाण्याचे बाष्पीभवन वाढल्याने धरणातील पाण्यात घट सुरू आहे. शेती तसेच पिण्यासाठी पाणी सोडले जात असल्याने धरणांतील पाण्याची पातळी दर तासागणिक खाली जात आहे. खडकवासलातून शेतीसाठी ११०५ क्सुसेक्स व पिण्यासाठी ५८० क्सुसेक्स पाणी सोडले जात आहे. त्यामुळे पानशेत व वरसगाव धरणातून खडकवासला धरणात प्रत्येकी ६०० क्सुसेक्स पाणी सोडले जात आहे. त्यामुळे दोन्ही धरणांतील पाण्याची पातळी खाली गेली आहे. पानशेतमध्ये २.५२ टीएमसी म्हणजे केवळ २३.६७ टक्के, तर वरसगावमध्ये ३.८६ टीएमसी म्हणजे ३०.१४ टक्के पाणी आहे.

# हा फक्त ट्रेलर आहे, पिक्चर अभी बाकी है : कोल्हे

शिरूर : : शिरूर लोकसभेचे उमेदवार अमोल कोल्हे यांनी शिवाजीराव आढळराव पाटील यांच्यावर निशाणा साधताना आढळराव पाटील यांनी संसदेत स्वतःच्या कंपनीच्या फायद्यासाठी संरक्षण खात्याविषयीच प्रश्न विचारले होते, असा आरोप केला होता. यानंतर आता अमोल कोल्हे यांनी थेट पुरावेच सादर करत आढळराव पाटील यांना कोंडीत पकडत, हा फक्त ट्रेलर आहे, पिक्चर अभी बाकी है, असे सुनावले आहे.




ओतूरच्या सभेत डॉ. अमोल कोल्हे यांनी प्रतिस्पर्धी उमेदवार शिवाजीराव आढळराव पाटील यांच्यावर 'हे तर लोकप्रतिनिधीच्या वेशातील व्यापारी', असा थेट आरोप केला होता. त्यानंतर शिवाजीराव आढळराव पाटील यांनी पुरावे द्या, नाहीतर निवडणुकीच्या रिंगणातून माघारी घ्या, असे आव्हान दिले होते. डॉ. कोल्हे यांनी हे आव्हान स्वीकारल्याचे सांगत, शब्द फिरवत माघार घ्यायची नाही, असे प्रतिआव्हान आढळराव पाटील यांना दिल्यानंतर त्यांनी पुरावे दाखवणारा व्हिडीओ सोशल मीडियावर प्रसिद्ध केलाय. डॉ. कोल्हेंचा हा व्हिडीओ सोशल मीडियावर चांगलाच व्हायरल होतोय.

आढळराव पाटलांनी लोकसभेत ७ एप्रिल २०१७ आणि १३ फेब्रुवारी २०१९ रोजी मांडलेल्या प्रश्नांची कागदपत्रे अमोल कोल्हे यांनी दाखवली आहेत. आढळराव पाटलांनी स्वतःच्या कंपनीच्या फायद्यासाठी पदाचा गैरवापर केला, असा आरोप करत याचं उत्तर त्यांनी जनतेला द्यावं, शिवाय मी पुरावे दिल्यावर लोकसभेच्या निवडणुकीतून बाहेर पडणार, हा दिलेला शब्द आता आढळरावांनी पूर्ण करावा, असे प्रतिआव्हानही अमोल कोल्हेंनी दिले आहे. 'हा फक्त ट्रेलर आहे, पिक्चर अभी बाकी है' असे म्हणत १७ मार्च २०१७, ९ डिसेंबर २०१६ आणि २६ डिसेंबर २०१८ या तारखांना कंपनीच्या हितासाठी मांडलेल्या प्रश्नांची आठवण करून दिली. सोबत कागदपत्रांचा गठ्ठा दाखवत हे सगळे पुरावे टप्प्याटप्प्याने जनतेसमोर मांडणार असल्याचा इशारा देत, कोल्हे यांनी आढळरावांचं टेन्शन वाढवलं आहे. शिरूरसारख्या ग्रामीण मतदारसंघातल्या तत्कालीन खासदार आढळराव पाटलांनी संरक्षण विभागाला डिफेन्स पार्ट्स पुरवणार्या कंपनीचे प्रश्न विचारल्याने नागरिकांना आश्चर्य वाटत आहे. आता आढळराव पाटील कसा 'डिफेन्स' करणार याकडे सर्वांचे लक्ष लागले आहे. गावा-खेड्यातले, शेतीमातीचे प्रश्न सोडून आढळराव भलतेच प्रश्न लोकसभेत मांडत असताना आढळून आल्याने संशयाचे मळभ आणखीन गडद होतेय, असेही कोल्हे यांनी सांगितले.

# बिबट्याच्या हल्ल्यात महिला गंभीर जखमी : स्थानिकांचा आक्रोश

**नारायणगाव । प्रतिनिधी**

जुन्नर तालुक्यातील पिंपळवंडी येथील लेंडेस्थळ येथे रविवरी (दि.५) सायंकाळी पाचच्या सुमारास कोबीच्या शेतामध्ये खुरपणी करणार्या महिलेवर बिबट्याने हल्ला केला. त्यात ही महिला गंभीर जखमी झाली आहे. अश्विनी मनोज हुळवळे (वय २४), असे या महिलेचे नाव आहे. या महिलेला नारायणगाव येथील खासगी रुग्णालयामध्ये दाखल करण्यात आले आहे. तिच्या डोक्याला व मानेला गंभीर जखमा झाल्या आहेत. तसेच श्वसननलिकेला छिद्र पडले असून, त्या ठिकाणी डॉक्टरांनी नळी बसवली आहे. या महिलेची प्रकृती चिंताजनक असल्याचे डॉक्टरांनी सांगितले.



याबाबत अधिक माहिती अशी की, लेंडेस्थळ येथील शेतकरी भाऊ सदाशिव लेंडे यांच्या कोबी पिकाची खुरपणी अशोक हुळवळे, मंगल हुळवळे व अश्विनी हुळवळे करीत होते. घरी लहान बाळ असल्यामुळे आजी मंगल हुळवळे घरी गेल्या. त्यानंतर बिबट्याने अश्विनी यांच्यावर पाठीमागून येऊन हल्ला केला. मानेला पकडून त्यांना बाजूच्या शेतात फरफटत नेले. भाऊसाहेब लेंडे यांच्यासह स्थानिक शेतकर्यांनी आरडाओरड केल्याने बिबट्याने महिलेला सोडून पळ काढला. दरम्यान, जखमी अश्विनी यांना सारिका लेंडे, बाळू लेंडे व अशोक हुळावळे यांनी तातडीने नारायणगाव येथील एका खासगी रुग्णालयामध्ये उपचारासाठी दाखल केले.

घटनेची माहिती कळतात वनक्षेत्र अधिकारी वैभव काकडे हे नारायणगाव येथील रुग्णालयात तत्काळ दाखल झाले. जखमी महिलेच्या नातेवाइकांनी वनक्षेत्र अधिकारी काकडे यांना गराडा घालून बिबट्या किती लोकांचे बळी घेणार आहे ? किती लोकांना हल्ला करणार आहे ? तुम्ही काय झोपा काढता का ? नोकरीचा राजीनामा द्या आणि घरी जा. पकडलेले बिबट्या नक्की सोडता कुठे ? तुम्हाला बिबट्यांचा फार कळवळा आहे तर तुम्ही सांभाळा. आम्ही किती दिवस बिबट्याचा उपद्रव सहन करायचा ? असे प्रश्न उपस्थित केले. तसेच यापुढे पुन्हा बिबट्याने आमच्या परिसरामध्ये कोणावर हल्ला केल्यास सामूहिक पद्धतीने बिबट्याला ठार मारू, असा इशारा स्थानिक नागरिकांनी दिला आहे.

# पिरंगुट घाटात वऱ्हाडाच्या बसला आग; कोणतीही जीवितहानी नाही

पिरंगुट : : पिरंगुट घाटामध्ये चाले (ता. मुळशी) येथून स्वारगेट (पुणे) येथे वर्हाड घेऊन जाणार्या खासगी बसने अचानक पेट घेतला. रविवारी (दि. ५) रात्री १० वाजेच्या सुमारास ही घटना घडली. बसमधील एका महिलेला धूर येत असल्याचे लक्षात आल्याने तिने प्रसंगावधान राखत चालकास माहिती दिली. त्यामुळे वेळीच सर्व वर्हाडी बसमधून खाली उतरले. त्यामुळे मोठी दुर्घटना टळली. त्यानंतर बस पूर्णपणे जळून खाक झाली.



चाले येथील लग्नकार्य उरकून स्वारगेटच्या दिशेने वर्हाडी मंडळींना घेऊन खासगी बस स्वारगेट (पुणे)च्या दिशेने जात होती. बसमध्ये जवळपास २० जण होते. त्यामध्ये लहान मुले, महिला तसेच ज्येष्ठ नागरिकांचा समावेश होता. रात्री १० वाजता बस पिरंगुट घाटातून वर आली असता शेवटच्या टप्प्यावर म्हसोबा मंदिरासमोर बसच्या इंजिनमधून अचानक दूर येऊ लागला.यावेळी बसमधील वैशाली भानुदास सुतार (रा. लोणंद, ता. खंडाळा, जि. सातारा) यांना धूर दिसून आला.

त्यांनी प्रसंगावधान राखत ही बाब चालकाच्या निदर्शनास आणून दिली. त्यामुळे चालकानेदेखील तातडीने सर्व वर्हाडींना बसमधून खाली उतरवले आणि काही मिनिटांतच बसला आगीच्या ज्वाळांनी घेरले. बस जळून खाक झाली. त्यानंतर अग्निशामक दलाचा बंब आला. जवानांनी आग आटोक्यात आणली. 'वेळ आली होती परंतु काळ आला नव्हता,' अशी भावना या अपघातातून बचावलेल्या वर्हाडी मंडळींना व्यक्त केली. या वेळी घाटात काही काळ वाहतूक कोंडी झाली होती. काही स्थानिक युवकांनी वाहतूक नियंत्रित केली. दरम्यान जळालेली ही बस स्कूल बस असल्याची माहिती बसमधील काहीजणांनी तसेच प्रत्यक्षदर्शी यांनी दिली.

# केंद्रीय विद्यालयात प्रवेशाच्या आमिषाने दीड लाखाला गंडा

**पुणे । प्रतिनिधी**

खडकवासलामधील केंद्रीय विद्यालयात पहिलीत प्रवेश मिळवून देण्याच्या आमिषाने एक लाख ४३ हजार रुपयांची फसवणूक केल्याचा प्रकार उघडकीस आला आहे. याप्रकरणी एकाविरुद्ध गुन्हा दाखल केला आहे. पैसे परत मागितल्याने आरोपीने तक्रारदाराला जिवे मारण्याची धमकी दिली. याबाबत एनडीए रस्त्यावरील एका सोसायटीत राहणार्या व्यक्तीने वारजे पोलिस ठाण्यात फिर्याद दिली आहे.

पोलिसांनी या प्रकरणात अजित रामकृष्ण घाटपांडे (रा. शीतल प्लाझा, कात्रज-कोंढवा रस्ता) याच्याविरुद्ध गुन्हा दाखल केला आहे. तक्रारदाराची आरोपी घाटपांडे यांच्याशी दोन वर्षांपूर्वी ओळख झाली होती. खडकवासला परिसरातील गिरीनगर येथील केंद्रीय विद्यालयात मुलीला पहिलीत प्रवेश मिळवून देण्याचे आमिष आरोपीने दाखविले होते. तक्रारदार घाटपांडेला वारजे भागातील एका हॉटेलमध्ये भेटले. तक्रारादारकडून एक लाख ४३ हजार रुपये घेतले. तक्रारदारासह त्यांच्या ओळखीतील आणखी काही जणांनी घाटपांडेला पैसे दिले होते. पैसे घेतल्यानंतर त्याने प्रवेश मिळवून न दिल्याने तक्रारदाराने पैसे परत मागितले. पैसे परत देण्यास टाळाटाळ केल्याने तक्रारदाराने घाटपांडेला जाब विचारला. तेव्हा 'मी तुम्हाला संपवून टाकेल किंवा मी आत्महत्या करेल', अशी धमकी घाटपांडेने त्यांना दिली. त्यानंतर तक्रारदाराने पोलिसांकडे तक्रार दिली. गुन्हे शाखेचे पोलिस निरीक्षक निळकंठ जगताप तपास करत आहेत. घाटपांडेने केंद्रीय विद्यालयात प्रवेशाच्या आमिषाने अनेकांची फसवणूक केल्याचा संशय व्यक्त करण्यात आला आहे.

# खास माणसांचा नाही, सामान्यांचा मी खासदार असेन : रवींद्र धंगेकर

**पुणे । प्रतिनिधी**

मी खासदार झाल्यास सामान्य माणसांचाच असेल आणि येथील प्रत्येकजण तेव्हा खासदार असेल. यासाठी लोकसभा निवडणुकीत पुणेकरांनी मला भरभरून आशीर्वाद द्यावा, असे प्रतिपादन काँग्रेसचे पुणे लोकसभेचे उमेदवार रवींद्र धंगेकर यांनी केले. प्रचारफेरीदरम्यान पत्रकारांशी बोलताना धंगेकर म्हणाले, सध्या मूठभर उद्योजकांचे लाड केले जात आहेत. सामान्य माणसाकडे लक्ष दिले जात नाही. त्यांच्या प्रश्नांकडे दुर्लक्ष केले जात आहे. त्यांचे म्हणणे ऐकून घेतले जात नाही. मी निवडून आल्यास सामान्य माणसांचे प्रश्न सोडवण्याला प्राधान्य देईन.



मी याआधीही नगरसेवक असताना आणि आमदार झाल्यानंतरही सर्वसामान्यांचे प्रश्न सोडवण्यासाठी सतत धावून गेलो आहे. अनेकदा यंत्रणा आणि प्रशासन यांच्याकडून सामान्य माणसांची होरपळ होते. अशा प्रत्येक सामान्य माणसाच्या प्रश्नांची मी यापुढेही सोडवणूक करेन. शिक्षण, आरोग्य, रस्ते, तरुणांना रोजगार, उद्योग अशा विविध विषयांवर भरीव काम करेन. दिल्लीपर्यंत या पुण्याचा आवाज बुलंद करेन, असे धंगेकर यांनी सांगितले. ज्या महात्मा फुलेंनी पुण्यात पहिली मुलींची शाळा सुरू केली, तिथे मुलींच्या शिक्षणासाठी मी पुढाकार घेईन. गोरगरीब मुली शिकल्या पाहिजेत, यासाठी प्रयत्नांची पराकाष्ठा करेन, असे सांगून ते पुढे म्हणाले, माझा प्रत्येक क्षण पुण्याच्या विकासासाठी आणि पुणेकरांच्या हितासाठी असेल